बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक १८ | बुधवार, दि.१० एप्रिल २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# नाराज मतदारांसमोर पक्षाने लादलेला उमेदवार की विकास?

**गोंदिया:** भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या प्रचाराने वेग घेतला असून विकासाच्या नावावर भाजपचे उमेदवार मताचा जोगवा मागत आहेत.मात्र गावागावात त्यांनी न केलेल्या कामामुळे नाराजी ओढवावी लागत आहे.त्यातच पहिल्या टप्यातील ग्रीन बेल्टमध्ये असलेली ही जागा आत्ता ऑरेंजमध्ये आल्याने भाजपच्या उमेदवाराला काँग्रेसचा नवखा उमेदवार हा चांगली लढत देत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

खासदार म्हणून अपयशी ठरलेल्या मेंढेंना विजयी करण्याकरीता अखेर देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या सभेचे आयोजन पक्षाला करावे लागले.उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना येऊन धर्मावर भाषण ठोकावे लागले.तर गडकरीनाही या मतदारसंघात फिरण्याची वेळ आल्याने भाजपला ही जागा पाहिजे तशी सोपी राहिलेली नाही.पक्षातील नाराजी अद्यापही दूर झालेली नसून उमेदवाराला बघून नको तर नरेंद्र मोदींकरीता मत द्या ही म्हणायची वेळ आल्याने लादलेला उमेदवार की विकास यापैकी एक कुठलाही निवडला तरी मतदारांची मात्र होणारी पिळवणूक काही थांबणार नाही हे सत्य आहे.

त्यातच काँग्रेसने ही जागा शरद पवार यांनी मागूनही दिली नाही.नाना पटोलेंनी मी स्वतःलढणार असे सांगत जागा देण्यास नकार दिला.शरद पवार गटाकडून डॉ.खुशाल बोपचे यांचे नाव जवळपास नक्की झाले होते.मात्र पटोले असो की पटेल यांना कुठल्याही परिस्थितीत डॉ.बोपचेंना उमेदवारी मिळूच द्यायची नाही या एक विचाराचे राहिल्याने ही जागा शरद पवार गटाकडे न देता पटोलेंनी आपल्याकडे ठेवली.मात्र निवडणुकीच्या रिंगणातून स्वतःपळ काढत नवख्या उमेदवाराला उमेदवारी देत एकप्रकारे पक्षात आपली हूकूमशाही चालवली.ती हुकूमशाही मतदारसंघातील मतदार डोक्यावर साधा म्हणून घेतील यात शंका असून पटोलेंनी मात्र प्रशांत पडोळेच्या माध्यमातून त्यांच्या मनात नेहमी असणारा एक विरोध मात्र त्यांनी अप्रत्यक्षरित्या उमेदवारीतून दाखवल्याची चर्चाही मतदारसंघातील अनेक नेत्यामध्ये आहे.



या लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. यात भंडारा मतदारसंघात अपक्ष शिंदे गट समर्थक आमदार नरेंद्र भोंडेकर, तुमसरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राजू कारेमोरे, गोंदियात अपक्ष विनोद अग्रवाल आमदार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे साकोलीचे आमदार आहेत. तिरोडामध्ये भाजपचे विजय रहागंडाले आणि अर्जुनी-मोरगाव मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोहर चंद्रिकापूरे हे आमदार आहेत.विशेष म्हणजे गोंदिया जिल्हा परिषदेवर भाजप- राष्ट्रवादी काँग्रेस- तर भंडारा जिल्हा परिषदेवर काँग्रेस चरण वाघमारे गटाची सत्ता आहे. नगर परिषदावर सध्या प्रशासक राज आहे.तर नगरपंचायतीवर भाजप-काँग्रेस-राष्ट्रवादीचा ताबा आहे. एकंदरित लोकसभा मतदार संघावर भाजप राष्ट्रवादी महायुतीचे वर्चस्व आहे.

२०१८ खासदारकी पोट निवडणुकीत राष्ट्रवादीने विजय मिळविला होता.तो विजय २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीला कायम ठेवता आला नाही.आणि परत हा मतदारसंघ भाजपच्या ताब्यात गेला.महत्वाचे म्हणजे या मतदार संघात जातकारण सर्वात प्रभावी आहे. प्रचाराला विकासाचा मुद्दा आणि राजकीय आकडेमोडीला जातीचे समीकरण असा या मतदार संघाचा मामला आहे.

हा मतदार संघ प्रफुल्ल पटेलांसाठी आणि नाना पटोलेंसाठी ओळखला जात असल्याने २०२४ च्या निवडणुकीत काय होते? याकडे लक्ष लागले आहे. नाना पटोले हे आपल्या गृहजिल्ह्यातील मतदारसंघावर राहणार आहे. ते बहुसंख्य कुणबी समाजाचे नेते असल्याने त्यांनी दिलेला संदेश महत्वाचा ठरु शकतो. तर २०१८ च्या पोट निवडणुकीतील पराभवानंतर भाजपने पोवार समाजाला उमेदवारीच नाकारल्याने पोवार समाजात मोठ्या प्रमाणात नाराजी दिसून येत आहे.जेव्हा की ७५ टक्के पोवार समाज हा भाजपचा मतदार आहे.भाजपचे विद्यमान खासदार सुनील मेंढे हे संघाचे कार्यकर्ते असून मोदी लाटेत २ लाख मतांनी विजयी झाल्यामुळे त्यानाच पुन्हा रिंगणात उतरवले आहे.

डिसेंबर २०१७ मध्ये खासदारकीचा राजीनामा पटोलेंनी दिला. त्यानंतर त्यांनी काँग्रेस प्रवेश केला. आणि भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाची पोटनिवडणूक झाली. ही पोट निवडणूक पटोलेंनी स्वत:च्या डोक्यावर घेत राष्ट्रवादीच्या उमेदवारासाठी रात्र-दिवस एक केले. मे २०१८ मध्ये झालेल्या या पोट निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर कुकडे ४ लाख ४२ हजार २१३ मते घेवून विजयी झाले. त्यांनी भाजपचे उमेदवार हेमंत पटले यांचा पराभव केला. पटले यांना ३ लाख ९४ हजार ११६ मते मिळाली.या निवडणुकीत पटोलेंनी पहिल्यांदा कुणबी कार्ड खेळला,या खेळात त्यांनी भाजपमधील काही गटालाही सांभाळून घेतल्याने पोवार समाजातील पटलेंना पराभव पत्करावा लागला.२०१९ मध्ये देशात असलेल्या मोदी लाटेत या मतदारसंघातून मेंढे हे निवडून येतील का अशी शंका भाजपसह मतदारात असताना मात्र सुनिल मेंढेनी राष्ट्रवादीचे नाना पंचबुध्दे यांचा २ लाखाच्यावर मतांनी पराभव केला.हा विजय भाजपसोबतच विरोधी पक्षांनाही आश्चर्यचकित करणारा ठरला होता.

परंतु यावेळी हेमंत पटले यांना पोटनिवडणुकीत पुन्हा तुम्हालाच उमेदावरी देऊ हा शब्द भाजपने पाळला नाही.आणि तिथूनच भाजपने पोवार समाजाला लोकसभेच्या उमेदवारीतून डावलण्यास सुरवात केली.केशवराव पारधीनंतर काँग्रेसनेही पोवारांना संधी दिली नाही.तर राष्ट्रवादीतही या समाजाला लोकसभेत संधी दिली गेली नाही. त्यातच मेंढेना पुन्हा संधी दिली गेली असली तरी काँग्रेसनेही यावेळी कुणबी समाजातीलच युवा चेहरा दिल्याने मेंढे की पडोळे या विवंचनेत कुणबी समाज दिसून येत आहे.मेंढेना गावपातळीवर होत असलेला विरोध बघता आपल्या नावावर व विकासावर नव्हे तर नरेंद्र मोंदी याच्या नावावर मताचा जोगवा मागायाची वेळ भाजपकडे आली आहे.त्यामुळे मतदार लादलेल्या उमेदवाराला विकासाच्या नावावर निवडून देतात काय बघायचे आहे.

# साडेपाच लाखांचे बक्षीस असलेल्या दोन जहाल महिला नक्षलवाद्यांना अटक

**गडचिरोली :** साडेपाच लाखांचे बक्षीस असलेल्या दोन जहाल महिला नक्षलवादी आणि एका समर्थकाला अटक करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. गडचिरोली पोलिसांच्या सी-६० पथकाने महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील जंगल परिसरात ही कारवाई केली. काजल ऊर्फ सिंधू गावडे (२८ , रा. कचलेर ता. एटापल्ली) व गीता ऊर्फ सुकली कोरचा (३१ , रा. रामनटोला, ता. एटापल्ली ) असे महिला नक्षलवाद्यांची नावे आहेत, तर पिसा पांडू नरोटे (रा. झारेवाडा ता. एटापल्ली ) असे समर्थकाचे नाव आहे.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घातपात घडवून आणण्याचा उद्देशाने गडचिरोलीमध्ये नक्षलवादी सक्रिय झाले आहेत. त्यांचे मनसुबे उधळून लावण्यासाठी पोलिसांनी देखील कंबर कसली असून मागील तीन महिन्यांपासून नक्षलविरोधी अभियान गतिमान करण्यात आले आहे. दरम्यान, महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील पिपली बुर्गी पोलीस ठाणे हद्दीतील जवेली जंगलात दोन जहाल महिला नक्षलवाद्यांना सी-६० पथकाने ७ एप्रिलला ताब्यात घेतले, यासोबतच गिलनगुडा जंगल परिसरातून समर्थकाच्या मुसक्या आवळल्या. या तिघांवरही महाराष्ट्र सरकारने तब्बल साडेपाच लाखांचे बक्षीस ठेवले होते. २०२० मध्ये कोपर्शी-पोयारकोटी जंगल परिसरात चकमक झाली होती. त्यात एक अधिकारी व एक जवान शहीद झाले होते. या चकमकीत काजल गावडे व गीता कोरचा या दोघींचा प्रत्यक्ष सहभाग होता, असे चौकशीत निष्पन्न झाले.

काजल ऊर्फ सिंधू गावडे ही २०१२ मध्ये वयाच्या १४ व्या वर्षीच नक्षलवादी चळवळीत दाखल झाली. प्लाटुन क्र. ५५ मध्ये सदस्य या पदावर भरती होऊन सन २०१९ पर्यंत कार्यरत होती. २०१९ मध्ये कंपनी क्र. ४ मध्ये बदली होऊन सन २०२० पर्यंत सदस्य पदावर होती. त्यानंतर ती डिव्हीजनल कमिटीत सदस्य पदावर होती. तिचा सात चकमकींत सहभाग होता. कनेली वपुसेर साखरदेव जंगल परिसरात शस्त्रे जमिनीत पुरुन ठेवल्याचाही आरोपही तिच्यावर आहे. तर गीतावर पाच गुन्हे असून ती २०१८ मध्ये भामरागड दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन सप्टेंबर २०२० पर्यंत कार्यरत होती. सप्टेंबर २०२० मध्ये माड एरीयामध्ये बदली होऊन ती सदस्य पदावर आतापर्यंत कार्यरत होती. चकमकीच्या तीन गुन्ह्यांत तिचा सहभाग होता. एका पोलीस जवानाच्या व निरपराध नागरिकाच्या हत्येचाही तिच्यावर आरोप आहे. समर्थक पिसा नरोटे वर देखील खूनासह विविध गुन्हे दाखल होते. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.

# महत्वपूर्ण रखडलेला भेल प्रकल्प साकोलीत सर्वांसाठी कळीचा मुद्दा

**गोंदिया:** महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष भूषविणाऱ्या आमदार नाना पटोले यांचा साकोली हा विधानसभा मतदारसंघ! अर्थाच त्यांच्या गृह मतदारसंघावर सर्वांच्याच नजरा आहेत. वनसंपदा, पर्यटन, उत्तम शेती, भेल प्रकल्पासह औद्योगिक विकासाला वाव असूनही निव्वळ राजकीय धोरणात रखडलेल्या येथील प्रश्नांचा गुंता अद्याप कुणालाही का आणि कसा सोडविता आला नाही, हा तर्क विचारला जाणारा प्रश्न आहे. त्या प्रश्नांची उत्तरे यावेळी सर्वच उमेदवारांना द्यावी लागणार आहेत.

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला हा मतदारसंघ मात्र १९९० पासून येथील राजकारणात स्थित्यंतर झाले.डॉ. हेमकृष्ण कापगते यांनी पहिल्यांदा काँग्रेसकडून हा मतदारसंघ भाजपच्या पदरात टाकला. पुढे १९९५ ची निवडणूक ही त्यांनीच जिंकली. यानंतरच्या काळात सेवक वाघाये यांचा राजकीय उदय झाला. १९९ ९ आणि २००४ या दोन्ही निवडणूका त्यांनी काँग्रेसच्या तिकिटावर जिंकल्या. याच काळात २००४ पर्यंत लाखांदूर हा विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात होता. लाखांदूर मधून नाना पटोले यांनी २००४ मध्ये निवडणूक जिंकली होती.




मात्र पुढे परिसिमन आयोगाच्या फेररचनेत हा मतदारसंघ साकोलीत विलीन झाला. नाना पटोले यांनी २००९ च्या निवडणुकीत साकोली गाठली. भाजपच्या तिकिटावर विजय मिळवून सेवक वाघाये यांचा पराभव केला. पुढे २०१४ च्या निवडणुकीत बाळा काशीवार यांनी निवडणूक जिंकून भाजपचा गड कायम ठेवला. २०१७ मध्ये खासदारकीचा राजीनामा देऊन भाजपमधून काँग्रेसमध्ये परतलेले नाना पटोले यांनी २०१९ मध्ये साकोलीतून विजय मिळवून जागा काँग्रेसकडे खेचून आणली. याच काळापासून परिणय फुके यांनी त्यांच्यापुढे येथे तगडे आव्हानही उभे केले.

३,२२,९६१ मतदार असलेल्या या मतदारसंघात कोणतेही उद्योग नाहीत. इंग्रज काळापासून विकसीत असलेल्या साकोलीत विकासासाठी बराच वाव आहे. तरी येथील विकासाकडे कुण्याही नेत्याने गंभीरपणे पाहिले नाही. असा येथील मतदारांचा आरोप आहे. महामार्ग आणि उड्डारपुलाच्या पलीकडे या मतदारसंघात दाखविण्यासारखे जनप्रतिनिधीकडे काहीच नाही. त्यामुळे एक वेळ खासदारकी आणि तीन वेळा आमदारकी मिळविणारे नाना पटोले यांच्याकडेही जनतेचे बोट वळतेच.

## सिंचन विकासाची वानवा

**या मतदारसंघात सिंचन आणि ओद्योगिक विकासाची वानवा आहे. निम्म चुलबंद, भीमलकसा प्रकल्प अद्यापही १०० टक्के पूर्ण झालेला नाही. लाखांदूर तालुका तर विकासापासून कोसो दूर आहे. साकोलीत कृषी विज्ञान केंद्र आहे. मत्स्यबीज उत्पादन केंद्रही आहे. मात्र, त्याकडे सर्वच जनप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाले. पर्यटनाला वाव असला तरी कोणतीही विकासाची योजना नाही. लाखनी तालुक्यातील अशो लेलॅड वगळता अन्य कोणत्याही उद्योगाला वाव मिळाला नाही.**

## कधी सुरु होणार भेल

**भेल प्रकल्पाचे गाजर दाखवित शेतकरी आणि बेरोजगारांची थट्टाच जनप्रतिनिधींनी उडविल्याची भवना येथे दृढ आहे. राष्ट्रीय महमार्गालगत ४०० एकरांवर जागा अधिग्रहित आहे. मात्र फलक व संरक्षित भिंत शिवाय काहीच नाही, त्या जागेवर आता जंगल झाले आहे. प्रफुल्ल पटेल यांनी केंद्रीय मंत्री असताना २००९ मध्ये आणलेला हा प्रकल्प आजही दिवा स्वप्नच आहे. भाजप आणि काँग्रेस नेत्यांचे या प्रकल्पावरुन एकमेकावर होणारे आरोप प्रत्यारोप आता नेहमीचेच झाले आहेत.**

# निवडणूक कर्तव्यामध्ये कसूर करणारे कर्मचारी निलंबित

**भंडारा:** पवनी तालुक्यातील निलज चेकपोस्टवर सर्वेक्षण पथकातील कार्यरत दोघा कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यात कसूर करणे चांगलेच अंगलट आले. दोन्ही नियुक्त अधिकारी व कर्मचारी मद्यप्राशन करुन झोपलेले दिसून आले. निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी निवडणूक विषयक कर्तव्यामध्ये कसूर केल्याचा ठपका ठेवत पं.स. पवनी येथील विस्तार अधिकारी एल. जे. कुंभारे व भंडारा पाटबंधारे विभागातील वरिष्ठ लिपीक सचिन पढाळ यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे जिल्हा प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघांतर्गत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीकरीता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी भंडारा यांच्या आदेशान्वये पंचायत समिती पवनी येथील विस्तार अधिकारी एल.जे.कुंभारे, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग भंडारा येथील वरिष्ठ लिपीक सचिन पढाळ, यांची पवनी तालुक्यातील निलज चेकपोस्ट या ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथकामध्ये नियुक्ती करण्यात आली होती.

दि.५ एप्रिल २०२४ रोजी निवडणूक निरीक्षक खर्च व सहाय्यक निवडणूक अधिकारी यांनी निलज चेकपोस्ट या ठिकाणी भेट दिली. त्यावेळी तहसीलदार पवनी व पवनी पोलीस निरीक्षक हे उपस्थित असतांना विस्तार अधिकारी एल.जे.कुंभारे व वरिष्ठ लिपीक सचिन पढाळ हे त्या ठिकाणी दिसून आले नाही. पोलीस टेंटमध्ये जाऊन पाहिले असता दोन्ही नियुक्त अधिकारी व कर्मचारी झोपलेले दिसून आले. त्यांना निवडणूक निरीक्षक यांचे समोर हजर केले असता त्यांना अधिकाऱ्यांशी योग्य संवाद सुद्धा करता आले नसल्याचे दिसून आल्याने ते मद्यप्राशन करुन झोपले होते. दोघांचीही वैद्यकीय तपासणी केली असता वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या अहवालात मद्यप्राशन केल्याचे नमूद करण्यात आले.

तसेच संबंधित कर्मचाऱ्यांवर पवनी तहसीलदारांनी फौजदारी गुन्हा दाखल केला. कर्तव्यावर असतांना मद्यप्राशन करुन झोपल्याचे आढळून आल्याने निवडणूक निरीक्षक खर्च यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी भंडारा यांचा अहवाल वैद्यकीय अधिकारी यांचा वैद्यकीय अहवाल विचारात घेता निवडणूक कर्तव्यावर असतांना मद्यप्राशन करुन स्थिर सर्वेक्षण पथकाच्या चेकपोस्टवर झोपणे. निवडणुकीच्या कामात हलगर्जीपणा, उचराई व कसूर करणे संबंधित कर्मचाऱ्यांचे निवडणूक विषयक कामकाजात बेजाबदार वर्तन दिसून आले. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी एका आदेशान्वये विस्तार अधिकारी एल.जे. कुंभारे, व वरिष्ठ लिपीक सचिन पढाळ या दोन्ही कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ कलम २८ ए अन्वये निलंबनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे जिल्हा प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

# जि.प.च्या ८७२ कर्मचाऱ्यांची बल्लेबल्ले

## ३८० शिक्षकांचाही समावेश; प्रोत्साहन भत्ता, अतिरिक्त घरभाड्याचा प्रश्न निकाली



**गोंदिया:** नक्षलग्रस्त आणि आदिवासी भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता देण्याचे निर्देश न्यायालयाने जिल्हा परिषदेला दिले. या निर्णयाचा लाभ जिल्हा परिषदेचे ३८० शिक्षक आणि ४९२ इतर कर्मचाऱ्यांना होणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या दीर्घ लढ्याला यश आले असून त्यांच्यात आनंदाचे वातावरण आहे. नक्षलग्रस्त आणि आदिवासी भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना त्या भागात कार्यरत असेपर्यंत एकस्तर वेतनश्रेणी व मूळ वेतनाच्या १५ टक्के किंवा किमान २०० रुपये व कमाल १,५०० रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता देण्याचे शासन आदेश आहेत. त्यासाठी विविध संघटनांकडून जिल्हा परिषदेकडे मागणी करण्यात आली होती. मात्र या विषयाला घेऊन जिल्हा परिषद टाळाटाळ करीत होती. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्यायालयाने बाजू पडताळून निर्णय दिला. यापुर्वीही अशा याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यावरही निकाल दिला. ही याचिकादेखील निर्णय दिलेल्या याचिकांना धरुनच असल्यामुळे न्यायालयाने जुन्या निकाली काढलेल्या याचिकांच्या आधारे निर्णय दिला.

### तत्काळ अंमलबजावणी करा

या निर्णयामुळे १८० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच जिल्हा परिषद महासंघातर्फे मागणी करण्यात आलेल्या ४९२ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पहिला, दुसरा व तिसरा लाभ मंजूर असल्यामुळे वेतनात तफावत निर्माण होत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना आदिवासी, नक्षलग्रस्त भागात कार्यरत असेपर्यंत एकस्तर वेतनश्रेणी व मूळ वेतनाच्या १५ टक्के किंवा किमान २०० रुपये आणि कमाल १,५०० रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहन भत्याचा व अतिरिक्त घरभाडे भत्ता अनुदेय असल्याचा निर्णय दिला. न्यायालयाच्या या निर्णयाचा लाभ जिल्हा परिषदेच्या ८७२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना झाला आहे. जिल्हा परिषदेने या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, असेही निर्णयात नमूद केले आहे.

# नव्या संचमान्यतेनुसार शिक्षक मिळविण्यासाठी विद्यार्थी आणायचे कुठून?

## जुने धोरण सुरु ठेवण्याची अपेक्षा, विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांची होणार धावपळ

**भंडारा:** दहावीच्या परीक्षा संपल्यानंतर प्राथमिक शाळांच्या परीक्षाही संपल्या आहेत. हायस्कूलच्या परीक्षा अंतिम टप्प्यात आहेत. परीक्षांचा निकाल लागेपर्यंत शिक्षक विविध कामांत व्यस्त असतात. त्यातच निवडणुकांची कामे करावे लागणार आहेत. याच काळात नव्या संचमान्यता धोरणानुसार विद्यार्थी पटसंख्या टिकविणे आणि वाढविण्यासाठी शिक्षकांची धावपळ वाढणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २०१९ मधील तरतुदीर विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे मंजूर करणे, एकाच वर्गात अधिक विद्यार्थी असल्यास शिक्षक पदे मंजूर करणे आदीबाबतचे नवे निकष लागू करण्यात आले आहे. हे धोरण (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खासगी अनुदानित, अंशत: अनुदानित) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे आदी अनुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेसंबंधी असणार आहे.

यात १ ते २० पटांच्या शाळांकरिता एक शिक्षक त्यानंतर दुसऱ्या पदांवर सेवानिवृत्त शिक्षकांची आवश्यकतेनुसार नियुक्ती करण्यात येणार आहे. वर्ग एक ते पाचवीसाठी विद्यार्थी संख्या २० ते ६० दोन शिक्षक, ३० संख्येच्या वाढीवर एक शिक्षक वाढत जाईल. यात २१० विद्यार्थी पटसंख्येपर्यंत आरटीई निकषानुसार प्रति विद्यार्थ्यांमागे एक पद देय राहील. वर्ग ६ ते ८ कोणत्याही दोन इयत्ता असल्यास विद्यार्थी संख्या २० ते ७० साठी २ शिक्षक, ७१ ते १०५ साठी तीन शिक्षक आणि १०५ विद्यार्थ्यांच्या पुढे प्रति ३५ विद्यार्थ्यांच्या मागे एक पद देय राहणार आहे. विशेष शिक्षक माध्यमिक शाळांसाठी क्रीडा, कला, संगीत, कार्यानुभव आदींकरिता वर्ग पहिली ते दहावीपर्यंत २५१ ते ५०० विद्यार्थी संख्यासाठी केवळ एक शारीरिक शिक्षण शिक्षक दिला जाईल.

५०१ ते ७५० पटसंख्येपर्यंत तिन्ही विषयांसाठी शिक्षक आहे. विद्यार्थी संख्या ७०१ च्या पुढे १५०० पर्यंत गेल्यास दोन ते तीन शिक्षक पदांपर्यंत संख्या वाढणार आहे. मुख्याध्यापक पदांसाठी १५० विद्यार्थी संख्या गरजेची आहे. मात्र पुर्वीच्या संरक्षणासाठी विद्यार्थी संख्या १३५ अशी आहे. परिणामी शाळेतील सर्वच घटकांचे लक्ष विद्यार्थी संख्येवर लागले आहेत.

## शाळेच्या गुणवत्तेसाठी शिक्षकांची कसोटी

**राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या सुचनेप्रमाणे विद्यार्थी पटसंख्येनुसार शिक्षक तसेच मुख्याध्यापकांची पदे अवलंबून राहणार आहेत. त्यामुळे शाळा टिकवायच्या असतील तर शिक्षकांना गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. शाळा स्पर्धेत टिकण्यासाठी मेहनत करावी लागणार आहे.**

## ग्रामीण शाळांना बसणार फटका

**पालक जागरुक झाला आहे. पालक शाळांत सुविधा पाहतात. विश्वास बसला तरच शाळा सोडण्याचा दाखला देतात. शाळेची भिस्त पटसंख्येवर असल्याने धाकधूक वाढणार आहे. कमी पटसंख्येना शाळांचा या निर्णयाचा सर्वाधिक फटका बसणार आहे.**



**नव्या धोरणानुसार ६ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची शाळांत भरती होणार आहे. आधीच शाळांची पटसंख्या रोडावली आहे. त्यात नव्या धोरणामुळे शााळा टिकविण्यासाठी शिक्षकांवर ताण येईल. सेवानिवृत्त शिक्षकांऐवजी शासनाने डी.एड. व बी.एड. तरुणांची २० हजार मानधनावर नियुक्ती करावी. शिक्षकांची स्थायी पद भरती करावी. जुने संचमान्यतेचे निकष कायम ठेवावे. यामुळे ग्रामीण शाळांना दिलासा मिळेल व शिक्षकांची पदेही कायम राहतील.**

**रमेश सिंगनजुडे,**
**जिल्हाध्यक्ष, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ भंडारा.**

# खासदार मेंढे यांना गावगाड्यातून विरोध; प्रचार न करताच परतण्याची नामुष्की

**गोंदिया :-** भंडारा-गोंदिया लोकसभेची निवडणूक पहिल्या टप्प्यात अर्थात १९ एप्रिल रोजी होत आहे. महायुतीचे उमेदवार विद्यमान खासदार सुनील मेंढे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्यात अटीतटीची लढत होईल, हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. या दोन्ही उमेदवारांचा प्रचार जोमात सुरू असला तरी खासदार मेंढे यांना गावकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. हा अनुभव एकट्या गोंदिया जिल्ह्यात नव्हे तर भंडारा जिल्ह्यातही त्यांना आला.



प्रचार न करताच त्यांना परत जाण्याची नामुष्की ओढवली. खासदार मेंढेजी तुम्ही आलात, तसे परत जा, असे म्हणत गावकरी त्यांना अक्षरशः हाकलून लावत आहेत.

खासदार असतानाही सुनील मेंढे यांनी खुर्चीच्या मोहापायी भंडारा नगर परिषदेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला नाही. कंत्राटदार असलेल्या मेंढे यांनी नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत कोट्यवधींची माया जमवली. म्हणूनच की काय खासदार होऊनही त्यांना हे पद सोडावेसे वाटले नसावे.

खासदारकीच्या कारकिर्दीत त्यांनी लाखांदूर तालुक्यातील जैतपूर हे गाव दत्तक घेतले. खासदार दत्तक गाव असताना किमान या गावात तरी विकासाची गंगा यायला पाहिजे होती, पण तसे झाले नाही. गावात रुपयाचा निधी खर्च न करणाऱ्या खासदाराला मग गावकरी धडा शिकवतील नाही त का? याचा अनुभव कालपरवा आलाच. विकासाचा आणि वचननाम्याचा रथ घेऊन मेंढे जैतपुरात पोहचले. हनुमान मंदिराशेजारी त्यांची प्रचारसभा होती. महायुतीतील घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले; खरे परंतु, क्षणात त्यांना एकवटलेल्या गावकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. खासदार मेंढे विकास दाखवा, अन्यथा चालते व्हा, असा संतापजनक सूर गावकऱ्यांचा होता. त्यामुळे त्यांना गावातून काढता पाय घ्यावा लागला.

पवनी तालुक्यातील आसगाव हे त्यांचे गृह गाव... या गावातही त्यांना प्रचंड विरोध आहे. गावचा पोरगा खासदार झाल्यावर विकासाच्या अपेक्षा गावकरी गावच्या पोराकडून करणार नाही तर कोणाकडून करणार? मात्र, या पोराने स्वतःचाच विकास केला. आम्हाला काय हवे...मूलभूत सुविधाच न? पण तेही होत नसेल तर त्याला धडा शिकवावाच लागेल.

## संपादकीय

# उष्णतेचा प्रकोप आणि दुष्काळाचे सावट

संपूर्ण देशभरात उष्णतेचा प्रकोप सुरू झाला आहे आणि हवामान खात्याने इशारा दिला आहे की, तापमान आता ४० डिग्रीच्या वर जाण्याची शक्यता आहे. या इशाऱ्यातच भावी दुष्काळाचे गर्भित सावट आहे. कारण अजून दुष्काळाची परिस्थिती नसली तरीही ग्रामीण भागात दुष्काळ आणि पाण्याची टंचाई ही संकटे दबक्या पावलांनी येत आहेत. टँकर लॉबी सक्रिय झाली आहे आणि त्यांचा धंदा जोरात होण्यास सुरुवात झाली आहे. सध्याच उन्हाच्या काहिलीने अंग होरपळत आहे आणि अजून तर मे महिनाही जायचा आहे. भारतात उष्णतेच्या प्रकोपाचा प्रश्न दरवर्षी असतो आणि ग्रामीण भागात तर त्याची तीव्रता इतकी प्रचंड असते की ग्रामीण भागात महिला, मुली डोक्यावर हंडे घेऊन मैलोनमैल पायपीट करत जाऊन पाणी आणत असतात. जमिनीतील पाण्याचा स्तर कमी होण्याचे हेच कारण असते.

हवामानातील सातत्याच्या बदलामुळे तापमान प्रचंड वाढत आहे आणि यालाच काही शास्त्रज्ञ ग्लोबल वॉर्मिंग म्हणतात. पण सत्य हे आहे की हवामानातील सातत्याने होणाऱ्या बदलाचा खरा फटका नेहमी शेतकऱ्यांना बसतो. आताही मे महिनाही आला नाही तोच राज्यात अनेक भागांत उभी पिके उन्हात जळून गेल्याच्या बातम्या येत आहेत. ग्रामीण भागात पाण्याची टंचाई याच महिन्यात होते आणि लोक पाणी पाणी करत असतात. मराठवाडा, विदर्भ या कायम दुष्काळी भागात दहा दहा किंवा वीस दिवसांनी पाणी येते. हे दरवर्षी दिसणारे चित्र आहे आणि ते बदलले पाहिजे. पण ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न अति गंभीर होण्याचे कारण म्हणजे बहुतेक लोक पाण्याच्या दैनंदिन गरजांसाठी भूजलावर अवलंबून राहतात.

पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असतो आणि अनेक तज्ज्ञांनी भूजलाचा स्तर खाली खाली जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. पण सरकारने आणि स्वयंसेवी संस्थांनीही लोकांना भूजलाचा कमी उपसा करण्यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण दुर्दैवाने तसे होत नाही आणि मग ग्रामीण भागात पाण्यासाठी भगवान म्हणण्याची वेळ येते. पाण्याचा उपसा एकीकडे अनिर्बंध केला जात असतानाच दुसरीकडे भारतीय शेतकरी उसाची शेती करत असतात. ऊस कोकणात होत नाही पण पश्चिम महाराष्ट्रात कित्येक एकर जमिनीवर ऊस उभा असतो.

उसाला पाणी जास्त लागते आणि कमी पाणी लागणारी पिके घेण्यास सरकारने प्रयत्न केले तरीही त्याला विरोध केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना कमी पाणी लागणारी पिके घेण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढते आणि शेतकऱ्यांना उत्पादनही जास्त मिळते. बाजरी, ऊस या पिकांना पाणी जास्त लागते आणि म्हणून ही पिके कमी प्रमाणात घ्या, असे पंतप्रधान मोदींनी आवाहन केले होते. अशी पिके मोठ्या प्रमाणावर घेतल्याने पाण्याचा उपसा जास्त होतो आणि त्याचा तोटा अखेरीस ग्रामीण भागातील लोकांनाच जास्त होतो. पण मोदी यांना त्यावेळी मोठा विरोध करण्यात आला.

भारतीय हवामान खात्याने जो उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे, तो संपूर्ण भारतासाठी गंभीर आहे. या उष्णतेच्या लाटेमुळे अनेक दुष्परिणाम होणार आहेत आणि त्यात लोक आजारी पडणे, दुष्काळ, पाण्याची टंचाई निर्माण होणे आणि विजेची मागणी वाढणे अशा अनेक उपसंकटांचा समावेश आहे. आताच अगदी राज्याच्या अनेक भागांत दुष्काळाच्या झळा सुरूच झाल्या आहेत, तर अनेक ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू लागले आहे. राज्याच्या अनेक भागांत पाणी आताच मिळेनासे झाले आहे आणि टँकर लॉबी सक्रिय झाली आहे. मागे महाराष्ट्रातील एका वयोवृद्ध नेत्यानेही दक्षिण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना उसाचे पीक कमी घेण्याचा सल्ला दिला होता. पण कुणीच तो मनावर घेतला नाही. राज्यात जी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, त्यामुळे अनेकांचे उखळ पांढरे होते, त्यामुळे दुष्काळ आवडे सर्वांना ही म्हण आजच्या परिस्थितीला योग्य वाटू लागते.

अद्याप दुष्काळी स्थिती निर्माण झाली नसली तरीही भावी दुष्काळाची पहिली पायरी म्हणजे ही उष्णतेची लाट आहे. शेतीसाठी पाणी पुरवताना राज्यात मानवांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये म्हणून राज्यातील फडणवीस सरकारने जी जल शिवार योजना राबवली होती, तिचा लाभही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना झाला होता. पण नंतर आलेल्या शिवसेना उबाठा सरकारने दुष्ट हेतूने ती चांगली योजना हाणून पाडली होती. पण आता ती पुन्हा नव्या जोमाने सुरू आहे. राज्याचा विकासाचा दृष्टिकोन असलेले सरकार असले की शेतीला आणि मानवांना पाणी पुरवण्याच्या योजना राबवल्या जातात. हवामान खात्याच्या इशाऱ्यामुळे अगोदरच देश ऊर्जेच्या वाढत्या मागणीशी झुंज देत असताना त्याच्या चिंतेत भरच पडली आहे.

ऊर्जेचा वापर शेतीसाठीही जास्त केला जातो आणि त्यामुळे हवामान खात्याच्या इशाऱ्याने सरकारची डोकेदुखी वाढली आहे. कृषी पंपांसाठीही वीज पुरवली जाते आणि त्यामुळे शेतकऱ्यांना वीज पुरवतानाच ग्रामीण भागातील शेतीला ऊर्जा पुरवण्याचे मोठे आव्हान सरकारपुढे आहे. मोदी सरकारने या संकटाची नोंद घेऊनच सूर्यघर योजना राबवली आहे. ज्यामुळे सौर पॅनल बसवून घरात विजेचा पुरवठा केला जात आहे. त्याचे ग्राहक सध्या कमी आहेत पण मोदी यांना हा आकडा शंभर कोटींपर्यंत न्यायचा आहे. एकूण काय तर उष्णतेची लाट आणि त्यामुळे नंतर येणाऱ्या संकटांचा एकूण आढावा घेतला, तर असे दिसते की अजून देशाला खूप मोठी मजल मारायची आहे. सरकार शेतकऱ्यांचे मन वळवण्यात खूप प्रमाणात यशस्वी झाले असले तरीही शेतकऱ्यांनी स्वत:हूनच संकट ओळखून त्याच्याशी मुकाबला करण्याची तयारी दर्शवली पाहिजे.

# वकिलांचे पत्र



दिल्लीच्या जवळपास सह–ाशे वकिलांनी न्यायमूर्ती चंद्रचूड यांना एक पत्र लिहिले आहे. वकिलांची एक गँग आपल्याला हवे तसे निर्णय लिहून घेण्या करता चंद्रचूड यांच्यावर दबाव आणत असून या गँगच्या प्रभावा पासून चंद्रचूड यांनी सावध राहावे असे या वकिलांनी सुचवले आहे. या पत्रावर सही करणाऱ्या वकिलांमध्ये हरीश साळवे, बार कौन्सिलचे अध्यक्ष मनन मिश्रा यांच्या सोबतच राजकीय पक्षाशी संबंधित असलेले बरेचसे वकील आहेत. यापैकी मनन मिश्रा यांनी तर एकदा निवडणूक लढवत स्वतःचे डिपॉझिट गमावल्याचे सांगण्यात येते. हरिश साळवे यांच्या बद्दल काय बोलावे? हे तेच महाशय आहे जे निवडणूक रोख्यांचा महाघोटाळा जनतेपर्यंत पोहोचू नये म्हणून जी–वाचे रान करत होते. या साळवेंची गंमत अशी आहे की, जो तपशील आपला अशील तीन महिन्यांपर्यंत सादर करू शकत नाही असा अर्ज घेऊन ते न्यायालयात गेले होते. त्यांच्या त्याचं अशीलाने हा तपशील २४ तासाच्या आत निवडणूक आयोगाकडे सोप–वून त्यांना तोंडघशी पडले होते. याचा अर्थ असाही घेतला जाऊ शकतो की मी तोंडघशी पडेल असे निर्णय घेण्याचे न्यायालयाने टाळावे असेही त्यांनी चंद्रचूड यांना सुच–वले असावे. हे पत्र म्हणजे सूचना होती की धमकी होती याचीही चर्चा सुरू आहे. चंद्रचूड यांच्यावर प्रभाव टाकणारी वकिलांची गँग म्हणजे प्रशांत भूषण, कपिल सिब्बल यांच्या सहित अजून काही वकिलांचा यात समावेश आहे. निवडणुकीच्या तोंडावर वकिलांनी अशा प्रकारचे पत्र न्यायमूर्तींना लिहिणे हा चर्चेचा विषय असला. तरी न्यायमूर्ती आणि वकिलांच्या या संवादात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेली उडी हा त्याहीपेक्षा जास्त चर्चेचा विषय ठरत आहे. कारण भारताच्या ७५ वर्षाच्या इतिहासात प्रथमच कोणता पंतप्रधान अशा प्रकारची कृती करताना दिसून येत आहे. खरं सांगायचं तर चंद्रचूड यांच्या निवडणूक रोख्यांच्या बाबती मधील निर्णयाने नरेंद्र मोदी फारच दुखावले आहेत. त्यांनी दहा वर्षे जपलेल्या त्यांच्या न खाऊंगा, न खाने दूंगा या प्रतिमेला या निर्णयाने तडा गेला आहे. त्यांच्याच मंत्रिमंडळातील अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांच्या पतीने निवडणूक रोख्यातील भ्रष्टाचार हा जगातील सर्वात मोठा भ्रष्टाचार असल्याचे म्हटले आहे.

वकिलांच्या या पत्रावर वास्तविक नरेंद्र मोदी यांना व्यक्त होण्याचे तसे काहीच कारण नव्हते. सर्वच यंत्रणा मुठीत असताना एकच न्यायाधीश आपल्या मनाविरुद्ध निर्णय देत असेल तर त्यांची उद्विग्नता आपण समजून घेतली पाहिजे. या ठिकाणी सुद्धा मोदींनी काँग्रेसचे नाव घेत टीका करण्याची संधी सोडली नाही. देशातील १४० करोड जनतेचा उल्लेख करण्याचे प्रयोजन काय हे सुद्धा समजू शकले नाही. याच उद्विग्नते मधून त्यांनी कल्कीधामच्या कार्यक्रमात कृष्ण आणि सुदामाचे उदाहरण देत सुप्रीम कोर्टाला मधात आणले होते. सुदामाच्या पोटली मधील मूठभर तांदुळाची किंमत किती असू शकते याचा अंदाज अजून सुद्धा पूर्णपणे आलेला नाही. मूठभर दाण्यातील दोन–चार दाणेच म ोजले तर त्याची किंमत सहा हजार करोड रुपये पेक्षा जास्त भरली. त्यामुळे आधुनिक सुदामा आणि कृष्णाची कृष्णकृत्य कशी चालतात याचा पुरता अंदाज देशवासियांना आलेला आहे. निवडणुकीच्या तोंडावर ही कृष्णकृत्ये उघडकीस येणे सुदामा आणि कृष्ण दोघांनाही अडचणीचे ठरत आहे. काही मूठभर वकिलाच्या दबावाखाली घेतलेला हा निर्णय मात्र तमाम भारतीय नागरिकांना सुखावून गेला आहे. मोदी आणि त्यांच्या कंपूला असाच चंद्रचूड यांनी वकिलाच्या या प्रभावाखाली येऊन घेतलेला. एक न आवडलेला निर्णय म्हणजे चंदिगडच्या महापौर निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाची बदमाशी उघड करणारा निर्णय होय. कॅम ेराच्या साक्षीने एवढ्या उजागरीने चाललेली बदमाशी संपूर्ण देशाने पहिल्यांदाच बघितली असेल. चंद्रचूड यांच्या या दोन निर्णयाने पुरत वस्त्रहरण झालेली भारतीय जनता पार्टी आता वकिलांच्या आडून चंद्रचूड यांना पत्र लिहीत आहे. या प्रकरणात मोदी बोलले नसते तर हे प्रकरण कदाचित वकील आणि न्यायमूर्ती यांच्याम धील आहे असे समजून त्यावर जास्त चर्चा झाली नसती. परंतु यामध्ये मोदींनी उडी घेतल्यावर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या मागील दोन कठोर निर्णयावर आधारित असल्याचे सगळ्यांच्याच लक्षात आले आहे.

ही जी वकिलांची टोळी आहे ती आता न्यायपालिकेवर दबाव टाकून कदाचित केजरीवाल यांना सुद्धा तुरुंगातून बाहेर काढेल अशी भीती नरेंद्र मोदी यांना वाटत अस–ावी. चॅनलवर चर्चा करणाऱ्या एका वकिलाने केजरीवाल यांची केस म्हणजे मुडदा नसलेली मर्डर केस असल्याचे म्हटले आहे. जी रक्कम सांगितली जाते ती कुठेच दिसत नाही. याउलट भारतीय जनता पक्षाचा सहा हजार करोड रुपयांचा मुडदा सर्वांना दिसत असताना त्यांच्यावर कारवाई करण्याची हिम्मत कोणाकडून दाखवली जात नाही. एवढ्या मोठ्या भ्रष्टा–चाराचा पडदाफाश झाल्यानंतर आता केजरीवाल्यांना मोकळे सोडण्याचा निर्णय न्यायालयाने घेऊ नये असे या पत्रामधून सुचवण्यात आले असण्याची शक्यता आहे.

निवडणूक जवळ येत असताना भारतीय जनता पक्ष सरकारी यंत्रणांना हाताशी धरून विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकण्याच्या योजना आखत आहे. न्यायालयाने या नेत्यांच्या अटकेला स्थगिती दिली तर मोदीची सर्व मेहनत पाण्यात जाणार आहे. उद्या या वकीलाच्या प्रभावाखाली येत एखाद्या न्यायमूर्तीने काँग्रेस पक्षाची गोठवलेले बँक खाते मोकळे करून दिले. तर तो पक्ष समर्थपणे निवडणूक लढवू शकेल याची भीती नरेंद्र मोदी यांच्या मनाला सतावत असावी. अशा प्रकारे विरोधकांना चारही बाजूने कोंडी करून, त्यांचे हातपाय बांधून अक्षरशः त्यांच्या मुसक्या आवळल्यावर त्यांच्या पुढे आबकी बार चारसो पार चे आव्हान देणे फार सोपे ठरते.

कारण आता संपूर्ण लढाई एकतर्फी करून ठेवलेली आहे. तरी सुद्धा मनात कुठेतरी शंकेची पाल चुकचूकत आहे. कारण मतदारापाशी डोळे आहेत, कान आहेत, मन आहे, बुद्धी आहे, विचारशक्ती आहे, सद्विवेक आहे, खऱ्या खोट्याची जाण आहे. या सर्व गोष्टींचा एकत्रितपणे वापर करण्याचे त्याने मनाशी ठाणले. तर गलीतगात्र विरोधकात प्राण फुंकण्याची शक्ती मतदारा जवळ आहे याची खात्री मोदी आणि भारतीय जनता पक्षाला आहे. भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतातील लोकशाही धोक्यात असल्याची चर्चा होत असल्याचे भान मतदारांना आहे. एखाद्या देशाने आपल्या अंतर्गत व्यवहारात ढवळाढवळ केली. तर हा आमचा अंतर्गत मामला आहे असे त्या दिशेला आपल्या परराष्ट्र मंत्रालयाकडून सुनवले जाते. इथे तर आमचे प्रधानमंत्री अमेरिकेत जाऊन तिथल्या व्यासपीठावरून ट्रम्प च्या निवडणुकीचा प्रचार करून आले आहेत.

या पूर्वीच्या आपल्या कोण्या पंतप्रधानांनी परदेशातल्या निवडणुकीत अशा प्रकारे नाक खूपल्याचे कोणाला आठवत आहे का? कुठे काय बोलायचं याचं भानच नसलेलं आगळ वेगळं व्यक्तिमत्त्व आहे हे. या निमित्त–ाने भारतीय जनतेला महा भ्रष्टा–चार उघड करणारा न्यायालयाचा निर्णय, निवडणुकीतील बदमाशी उघड करणारा न्यायालयाचा निर्णय काही वकिलांच्या प्रभावाखाली येऊन न्यायालयाने घेतला आहे असे म्हणणारा पंतप्रधान आम्हाला लाभला आहे याची जाणीव भारतीय जनतेला झाली आहे. या निमित्ताने आपण विरोधकाची केलेली कोंडी सुटणारा निर्णय न्यायालयाने घेऊ नये असे सुचवणारा पंतप्रधान आम्हाला लाभला आहे याची जाणीव भारतातील जनतेला झालेली आहे.

**पंकज वैद्य,९८२३०१४०४०**

# गोंदियात डॉ. आंबेडकरांना अभिवादन रॅलीचे आयोजन १२ एप्रिल रोजी

**पत्रकार उर्मिलेश आणि नविनकुमार येणार,अरविंद माळी यांचं कॅडर कॅम्प**





**गोंदिया :–** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या १३३ व्या जयंतीसाठी गोंदियात जय्यत तय्यारी सुरु झाली आहे. दरम्यान डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी गोंदिया शहरात १२ एप्रिल रोजी सकाळी अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर

१४ आणि १५ एप्रिल रोजी आयोजित या दोन दिवशीय कार्यक्रमा दरम्यान विविध उपक्रम राबविण्यात येणार आ–हेत. दरम्यान १४ एप्रिल रोजी आयोजित मुख्य कार्यक्रमात राज्यसभा ढत चे माजी कार्यकारी निदेशक आणि पत्रकार उमि ेलेश तसेच आर्टिकल नाईनटीन चॅनेलचे संपादक नवीणकुमार मुख्यवक्ता म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष जी. एल. तिरपुडे यांनी दिलेल्या माहिती नु–सार जयंतीच्या कार्यक्रमासाठी कार्यकर्ते कामाला लागले असून हा कार्यक्रम नगरपरिषद सुभाष शाळेच्या पटांगनावर होणार आहे. १३ एप्रिलच्या मध्यरात्री फटाक्याच्या लड्या फोडून अतिशबाजी करण्यात येईल. त्यांनतर सकाळी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून जयंतीच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होईल. शहरातील प्रत्येक भागातून ढोलताशाच्या गजरात रॅली काढण्यात येणार आहे. फुले शाहू आंबेडकरी विचारध–ारेवर देखाव्यांचे प्रदर्शन घडविण्यात येणार आहे. याप्रसंगी विविध समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांचा भारतीय राज्यघटनेतील प्रस्ताविका देऊन सत्कार करण्यात येईल. बालाघाट येथील प्रकाश सागर द्वारा प्रस्तुत प्रबोधनपर भीमगीतांची मैफ ल, पत्रकार उर्मिलेश आणि नवीन कुमार या मुख्य वक्त्यांचे प्रबोधन होणार आहे. दुसऱ्या दिवशी ता.१५ रोजी विद्यार्थ्यांची गुणवत्ता परीक्षा, प्रसिद्ध विचारवंत अरविंद माळी यांचे कॅडर कॅम्प, बुद्धिमान अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना कॉम्पिटिशन परीक्षेचे मार्गदर्शन होणार आहे.

दरम्यान सायंकाळी मुंबईच्या आंबेडकरी विचारवंत श्रेयाताई बनस–ोडे यांचं मार्गदर्शन आणि सायंकाळी मनोरंजनपर कार्यक्रमांतर्गत पुणे येथील प्रसिद्ध गायक संकल्प गोरे यांचा ऑर्केस्ट्रा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती समितीचे अध्यक्ष जी. एल. तिरपुडे, उपाध्यक्ष अरविंद भावे, कोकिळा राहुलकर, विलास वासनिक, अरविंद साखरे, नानाजी शेंडे, सविता उके, ज्योतीप्रकाश गजभिये, संतोष श्यामकुवर डॉ राजेश उके, अशोक कांबळे, सुनील डोंगरे, मच्छिन्द्र भेलावे, मनिषा गजभिये,सुशील गणवीर, संजय वाहने, सविता उके, अॅड अंजली चौरे, निशा मेश्राम आणि पृथ्वीराज कोल्हटकर यांनी केले आहे.

# भारतीय संविधान म्हणजे शोकलाही मूल्यांचा वर्धित अविष्कार-राजरत्न आंबेडकर

**भंडारा:** संविधानाच्या सरनाम्यातील भारतीय जनतेला दिलेली आश्वासने काळजीपूर्वक पाळली गेली तर ती एका अर्थाने भारतीय राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील महत्वपूर्वक क्रांतीची सुरुवात ठरली असती. खरे म्हणजे संविधानाला राजकीय न्यायाबरोबर सामाजिक व आर्थिक न्याय अपेक्षित आहे. भारतीय संविधान म्हणजे स्वतंत्र भारताच्या जनतेला त्यांचा हक्क व कर्तव्याची जाणीव करुन देणारा लोकशाही मूल्यांचा वर्धित अविष्कार आहे. असे प्रतिपादन दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ़ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी केले.

भंडारा येथील संविधान अमृत महोत्सव समितीच्यावतीने आयोजित तीन दिवसीय अमृतमहोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आंबेडकरी विचारवंत प्रा.डॉ. सरोज आगलावे होत्या. यावेळी महेंद्र गडकरी, धनंजय तिरपुडे, डॉ. रवींद्र वानखेडे, रुपचंद रामटेके, संजय मते, प्रशांत बागडे, संजय रामटेके आदि उपस्थित होते. डॉ. राजरत्न आंबेडकर म्हणाले, सामाजिक, आर्थिक न्यायाशिवाय राजकीय न्यायाला काय अर्थ आहे. भारतीय जनतेने आपल्या अधिकाराबरोबर आपले कर्तव्य बजावले पाहिजे.

अमृत बन्सोड यांनी संचालन, परिचय व प्रास्ताविक तर संयोजन प्रशांत सूर्यवंशी यांनी केले. समितीचे कोषाध्यक्ष अजय तांबे यांनी आभार मानले. महोत्सवासाठी प्रशांत बागडे, अजय तांबे, प्रशांत सूर्यवंशी, मंजूषा चव्हाण, आहुजा डोंगरे, प्रगती बागडे, सुशील नगराळे, भाष्कर सुखदेवे, दिनेश गोस्वामी, राजकुमार बन्सोड, किरण मेश्राम, संध्या बन्सोड, रीना लांडगे, विपुल रोडगे, निलिमा भालाधरे, अरविंद कान्हेकर, विजय सावध, गौतम कावळे, पुरुषोत्तम तांबे, श्रद्धा डोंगरे, निशांत सूर्यवंशी, अल्का मेश्राम, शेखर मोटघरे, निरुपमा भगत, सोनाली खापर्डे, अश–ोक बन्सोड, नीलेश नागदेवे, कोमल बन्सोड आदिंनी सहकार्य केले. यावेळी शहरासह जिल्ह्यातील अनेक संविधानप्रेमी उपस्थित होते.



### संविधानाचा जागर करणाऱ्यांचा सत्कार

**यावेळी संविधानाबद्दल जनजागृती होण्यासाठी संविधानाचा जागर करणाऱ्या चंद्रशेखर टेंभुर्णे, प्रा.डॉ. सुरेश खोब्रागडे, रोशन जांभुळकर, हिवराज उके, शुभद्रा झंझाड यांचा राजरत्न आंबेडकर यांच्या हस्ते संविधानाची प्रत, शाल, पुष्पगुच्छ व सम्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.**

### घर-घर संविधान उपक्रमाची गरज

**आंबेडकरी विचारवंत प्रा.डॉ.सरोज आगलावे म्हणाल्या आज भारतात घटनात्मक नैतिकतेचा अभाव दिसतो. घटनात्मक नैतिकता ही नैसर्गिक भावना नाही. तिची जोपासना करावी लागते. बहुजन हिताय व बहुजन सुखाय हे ध्येय राष्ट्रासमोर ठेवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या प्रगल्भ भूमिकेतून आपल्या देशात संविधानकि लोकशाही भरक्कम पायावर उभी राहण्यासाठी आणि लोकशाही प्रणालीची निकोप वाढ व्हावी, यासाठी त्यांनी जी प्रयत्नाची शर्त केली त्याला तोड नाही. घर-घर संविधान या उपक्रमाची सुरुवात व्हायला पाहिजे, असे त्या म्हणाल्या.**

# तथाकथीत आंबेडकरी विद्वानांसाठी

वंचित बहूजन आघाडीने लोकसभा निवडणूकीत ९ मतदार संघामध्ये स्वतंत्र उमेदवार उभे केल्यामूळे तथाकथीत आंबेडकरी विद्वानांनी सोशल मिडीयावर कम ालीचा हैदोस घातला आहे. अशा तथाकथीत आंबेडकरी विद्वानांसाठी आजचा लेखन प्रप्रच.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहील्याच सार्वत्रिक निवडणूकीत या देशाच्या राज्यघटनेचे प्रमूख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरेतर बिनविरोध निवडून देता आले असते. परंतू तत्कालीन काँग्रेस पक्षाने तसे केले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकसभेत निवडून जाता कामा नये यासाठी जंग जंग पछाडले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यो विरोधात नारायण काजरोळकर यांना काँग्रेंसने उभे केले. शेवटी त्यांचा पराभव केला. त्यानंतर झालेल्या पोट निवडणूकीत सूध्दा अशाच प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पराभूत करण्यात आले. सांगायचे तात्पर्य एवढेच आहे की, ज्या प्रमाणे अमेरिकेला स्वातंत्र्य मिळवून देणारे जॉर्ज वॉशिंग्टन यांना अमेरिकन जनतेने दोन वेळा बिनविरोध अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून दिले. एवढे मोठे मन भारतीय जनतेचे अजिबात नाही. कींबहूना त्यावेळी सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या काँग्रेसचे नाही.

नऊ खासदार निवडून आलेल्या रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे गेल्या ७० वर्षात सर्वात जास्त नूकसान कोणी केले असेल तर ते काँग्रेसने. ज्या? ज्या वेळी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ उभी रहाते त्या वेळी या चळवळीतील काही स्वार्थी लोकांना हाताशी धरून एखाद दुसरे मंत्रिपद देऊन कींवा एक दूसरी जागा देऊन संपूर्ण आंबेडकरी मते आपल्याकडे ओढण्याचे महापाप याच काँग्रेंसने केले आहे. आजमितीला रिपब्लीकन पक्षाचे कीती गट आहेत ते मोजता येणार नाहीत. अशा परिस्थितीत आंबेडकरी चळवळ एकसंघ होऊ पहात आहे. आंबेडकरी जनता एकसंघ पणे वंचित बहूजन आघाडी या पक्षाला भरभरुन पाठींबा देत आहे. गावागावातील, तळागाळातील जनतेमध्ये पून्हा एकदा स्वाभिमान जागृत होत असताना आणि आद–रणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात जनता एकसंघपणे वंचित बहूजन आघाडी या पक्षाच्या मागे उभी रहात असताना आंबेडकरी चळवळीतील काही झारीचे शुक्राचार्य जे आजपर्यंत काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या पक्षाच्याा वळचणीला होते ते आज सोशल मिडीयावर वंचित बहूजन आघाडीच्या बद्दल चूकीची आणि दिशाभूल करणारे व्हिडीओ टाकत आहेत.

या तथाकथीत विचारवंताना माझा एक प्रश्न आहे. १९५२ च्या निवडणूकीत त्या वेळचा जनसंघ आणि आताचा भारतीय जनता पार्टी या पक्षाला केवळ ३ जागेवर विजय मिळाला होता. १९५२ ते २०१४ या ६२ वर्षाच्या काळात या पक्षाचा चढता आलेख पहाता या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपला स्वाभिमान गहाण न ठेवता ६२ वर्षे अहोरात्र मेहनत केल्यामुळे त्यांना २०१४ मध्ये एकहाती सत्ता मिळविता आली यामधून आपण काही शिकणार आहोत की नाही. या तथाकथीत आंबेडकरी विद्वानांना आयते आणि तात्काळ पाहीजे. म्हणजेच वंचित बहूजन आघाडी या पक्षाची स्थापना पाच वर्षापुर्विची. पहील्या सहा महीन्यातच या पक्षाने स्वतः च्या ताकतीवर २५ लाख मते घेतली आहेत. १९५२ च्या नंतर आंबेडकरी पक्षाला मिळालेली सर्वांत जास्त मते आहेत. अशा वेळी वंचित बहूजन आघाडीला आपल्या मताची टक्केवारी वाढविणे, जनमाणसांत आपली मते रुजविणे आणि संघटना मजबूत करण्यासाठी अजून पाच वर्षे देणे आवश्यक आहे. त्यानंतरच या पक्षाची स्वतःची एक ताकद निर्माण होऊ शकते. परंतू काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या पक्षाच्या वळचणीला लागलेल्या या तथाकथीत विद्वानांना वंचित बहूजन आघाडी पेक्षा काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या पक्षाची जास्त काळजी आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, वंचित बहूजन आघाडी स्वतंत्र पणे लढली तर महाविकास आघाडीचे नूकसान होऊ शकते आणि त्यामूळे भारतीय जनता पार्टी सत्तेवर येऊन भारतीय संविधान बदलू शकते आणि भारतीय लोकशाही संपुष्टात येऊ शकते.

माझा साधा प्रश्न आहे , भारतीय लोकशाही आणि भारतीय संविधान वाचविण्याचा ठेका फक्त वंचित बहूजन आघाडीनेच घेतला आहे काय? उत्तर प्रदेशात बहन मायावती स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहेत. त्यामूळे भाजपाला फायदा होत नाही काय ?, आमचे आदरणीय मंत्री रामदासजी आठवले हे थेट भाजपाच्या गोटात आहेत. त्यांचे मतदार म्हणजेच रिपब्लीकन पक्ष (आठवले) या पक्षाचे कार्यकर्ते आंबेडकरी कार्यकर्ते नाहीत काय? आणि ते भाजपाला मतदान करून लोकशाही वाचवत आहेत की संविधान वाचवित आहेत? माननीय जोगेंद्र कवाडे (पिपल्स रिपब्लीकन पार्टी) महायूतीमध्ये आहेत ते सूध्दा आंबेडकरी नेते आहेत. ते सूध्दा महायूती म्हणजेच भाजपाला मतदान देणार आहेत मग माननीय जोगेंद्र कवाडे हे संविधान आणि लोकशाही वाचवत आ–हेत का? याचे उत्तर तथाकथीत आंबेडकरी विचारवंतानी दयावे.

वंचित बहूजन आघाडीचे प्रमूख आदरणीय बाळासाहेब आंबेडकर आहेत आणि त्यांचे आजोबा म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहीले म्हणून त्यांनीच संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठी महाविकास आघाडीला बिनशर्त पाठींबा दयावा असे आपल्याला वाटते का? महाविकास आघाडी ही भारतीय लोकशाही आणि संविधान वाचविण्यासाठी लढत नसून आपण केलेली दृष्कृत्ये लपविण्यासाठी आणि आपली घराणेशाही टिकविण्यासाठी लढत आहे. यामध्ये वंचित बहूजन आघाडीने आपला बळी दयावा असे कोणाला वाटत असेल तर ते कदापी चालणार नाही.

कोणतीही स्त्रि आपले सर्वस्व गहाण ठेऊन एकनिष्ठ राहू शकत नाही. आंबेडकरी चळवळ ही स्वाभिमानी चळवळ आहे. ती ग्यांची चळवळ नाही. त्यामूळे एक दोन जागेसाठी अख्खी आंबेडकरी चळवळ दुस–यांच्या दावणीला बांधण्याचे दिवस आता संपले आहेत. या देशाची लोकशाही आणि संविधान धोक्यात आले तर फक्त आंबेडकरी जनतेलाच त्याचा त्रास होणार आहे का ? या देशातील लोकसंख्येच्या ५० टक्के असणा–या स्त्रियांनाच सर्वात जास्त त्रास हा त्यांना होणार आ–हेत. उदया मनूस्मृती लागू झाली तर याच ५० टक्के स्त्रियांवर बंधने आल्याशिवाय रहाणार नाहीत. या देशातील ओबिसी, आदीवासी, मुस्लिम यांना सूध्दा याचा फटका बसणार आहे याचा विचार मत देताना प्रत्येक मतदारांनी विचार करावा. त्यामूळे भारतीय लोकशाही आणि संविधान वाचविण्याच्या नावाखाली आपण केलेली दृष्कृत्ये लपविण्यासाठी आणि आपली घराणेशाही टिकविण्यासाठी, म हाविकास आघाडीसाठी तथाकथीत आंबेडकरी विचारवंतानी आपली बुध्दी पाजळू नये हीच विनंती.

**प्रा.सुबोध कुमार**

# अक्षयतृतीया दिवशी होणारे बाल विवाह थांबविण्याचे आवाहन

**गोंदिया :** समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर असलेला अशिक्षितपणा, मागासलेपणा, गरीबी, लहान वयात लग्न करण्याचे रुढी परंपरा जाती व्यवस्था यामुळे बाल विवाहाचे प्रमाण वाढत आहेत. भारतीय संस्कृतीत विवाह ही समाजा–तील महत्वाचे आणि सार्वत्रिक सामाजिक क्रिया आहे. साहजिकच शुभ मुहूर्तावर सामुदायिक तसेच एकल विवाह समारंभ आयोजित केले जातात. यामध्ये बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर्षी अक्षयतृतीया हा दिवस १० मे २०२४ रोजी असून यावेळी बालविवाह सुध्दा मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अक्षयतृतीया दिवशी होणारे बालविवाह थांबवावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनीकर यांनी केले आहे.



३ जून २०13 च्या अधिसूचनेनुसार तसेच बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ कलम १६ ची पोटकलमे (१) व (३) नुसार बालविवाह प्रकल्प अधिकारी (नागरी) आणि प्रकल्पांतर्गत नेमलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिका व ग्रामपंचायत स्तरावर संबंधीत ग्राम पंचायतचे ग्रामसेवक यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्यामुळे बालविवाह रोखणे आणि बाल हक्कांचे संरक्षणासाठी अधिक सक्षमपणे प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकांनी याची खबरदारी घेतली पाहिजे.

१८ वर्षाच्या आत मुलीचे लग्न व २१ वर्षाच्या आत मुलाचे लग्न लावणे हा कायद्याने गुन्हा आहे. बालविवाह करणे कायद्याने गुन्हा असून बालकांशी विवाह करणाऱ्याला व करुन देणाऱ्याला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद व १ लाख रुपये दंड किंवा दोन्ही होऊ शकते. असे बालविवाह आपल्या गावात होत असल्यास तसेच बाल विवाहाबाबत माहिती प्राप्त होताच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे, संरक्षण अधिकारी रविंद्र टेंभूर्णे, संरक्षण अधिकारी मुकेश पटले यांचेकडे तसेच चाईल्ड हेल्पलाईन १०९८ टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्यात यावी.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# बेवारटोलाचे प्रकल्पाचे पाणी सिंचनासाठी ठरले स्वप्नच!

## २८ वर्षे लोटली तरी प्रकल्प पूर्ण होईना, इच्छाशक्तीचा अभाव अन् शासनाचे दुर्लक्ष



**सालेकसा:–** तीन वर्षात प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळून आदिवासी क्षेत्र सुजलाम, सुफलाम होईल या अपेक्षेने जानेवारी १९९६ मध्ये भूमिपूजन करुन सुरु करण्यात आलेला बेवारटोला प्रकल्प २८ वर्षे लोटली तरी पूर्ण झाला नाही. अपूर्ण कालव्यांमुळे तसेच प्रकल्पाचे काही काम अर्धवट पडून असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला आजही प्रकल्पाच्या पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. याशिवाय तालुक्यातील काही नवीन प्रस्तावित प्रकल्प सुद्धा शासनाच्या उदासीनतेमुळे थंडबस्त्यात रखडले आहेत. त्यामुळे सालेकसा तालुक्यात शेतीचा विकास होऊ शकला नाही. बेवारटोला प्रकल्पाचे पाणी सिंचनासाठी मिळेल हे स्वप्नच ठरले आहे.

अति दुर्गम नक्षलग्रस्त डोंगराळ भाग असलेला दरेकसा परिसरात आदिवासी लोकांचे वास्तव्य अधिक आहे. या भागात सिंचनाची सोय करुन शेतीला समृद्ध करुन लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवर बेवारटोला लघु प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार जानेवारी १९९६ मध्ये तत्कालीन पाटबंधारे मंत्री महादेवराव शिवणकर यांच्या हस्ते बेवारटोला प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले.

पुढील तीन वर्षात प्रकल्प पूर्ण होऊन आदिवासी भागातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळेल अशी अपेक्षा होती. त्यानुसार प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली. १९९९ मध्ये युतीचे सरकार गेले आणि आघाडी सरकार आले. त्यानंतर प्रकल्पाचे काम अपेक्षित होऊ लागले. पुढे निधीची गरज असताना दशक लोटले तरी प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. तर पाठपुराव्यामुळे धरणाचे काम पूर्णत्वाकडे येऊ लागले. परंतु आता २८ वर्षे लोटली तरी पाणी वितरण करणारे दोन्ही कालवे अर्धवट असल्यामुळे काही मोजक्याच शेतकऱ्यांना पाणी मिळत आहे. उजवा कालवा पाच किलोमीटर प्रस्तावित असून फक्त तीन किलोमीटर बनलेला आहे. डावा कालवा आठ किलोमीटर प्रस्तावित असून फक्त चार किलोमीटर बनलेला आहे.

### अर्धवट कालवे केव्हा पूर्ण होणार?

**या कालव्यातून शेतीला पाणी वाटप करण्यासाठी ज्या छोट्या वितरिका लागतात त्यासुद्धा आजपर्यंत तयार करण्यात आल्या नाहीत. परिणामी शेती ओलिताखाली येते, परंतु प्रत्यक्षात वरथेंबी पावसावरच अवलंबून आहे. अर्धवट कालवे केव्हा पूर्ण होणार आणि प्रकल्प शेतकऱ्यांच्या फायद्याचा कधी ठरणार, हे सांगता येत नाही. यासाठी लोकप्रतिनिधींची शासनाकडे सतत पाठपुराव्याची गरज असून ती त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. पण नेमका त्याचाच अभाव आहे.**

### प्रस्तावित प्रकल्प थंडबस्त्यात

**पिपरिया परिसरासाठी बहुउपयोगी ठरणारा काशीनाला प्रकल्प तसेच जांभळी जवळील कोठीटोला प्रकल्प पूर्ण झाल्यास तालुक्यातील बहुतांश शेती सुजलाम सुफलाम होऊ शकते. परंतु हे दोन्ही प्रकल्प थंडबस्त्यात असून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा नसल्याने हे प्रकल्प थंडबस्त्यात आहेत. त्यामुळे तालुक्यात अनेक नदी, नाले असूनही आणि उशी जवळून पाणी वाहत असताना शेती तहाणलेलीच असते.**

### निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधींचा पडला विसर

**लोकप्रतिनिधींनी निवडणुकीपुर्वी आश्वासने दिली. परंतु निवडून आल्यानंतर त्यांना याचा विसर पडला. याशिवाय तालुक्यात इतरही लघु प्रकल्प आणि उपसा सिंचन प्रकल्प अर्धवट राहिलेले आहे. त्याकडे सुद्धा लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन आपले कर्तव्य पार पाडण्याची गरज आहे.**

### शेतकरी म्हणतात केव्हा होणार प्रकल्प पूर्ण

**बेवारटोला प्रकल्पातील दोन्ही कालवे पूर्ण झाल्यास परिसरातील दहा-बारा गावांतील शेतकऱ्यांच्या शेतीला पाण्याची सोय होऊन खरीप आणि रब्बी हंगामात सुद्धा पीक घेण्याची संधी उपलब्ध होईल आणि आदिवासी शेतकऱ्यांची समृद्ध होऊन त्यांचे जीवनमान उंचावेल.**

**बारेलाल वरकडे, शेतकरी धनेगाव**

**माझे कुटुंब पूर्णत: शेतीवर आधारित असून बेवारटोला प्रकल्पाचे पाणी दोन्ही हंगामात मिळाले तर आपण शेतीतून उन्नती साधू शकतो यासाठी शासनाने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि अपूर्ण कालवे पूर्ण करण्यासाठी लक्ष द्यावे, हा प्रकल्प लवकर मार्गी लावावा.**

**धर्मदास बनोठे, शेतकरी टोयागोंदी**

# मुरकुटडोह येथील रेशन दुकान केले रद्द

## मागील तीन वर्षांत दुसऱ्यांदा कारवाई, खोटी तक्रार केल्याचा दुकानदाराचा आरोप

**सालेकसा:** गावकऱ्यांच्या तक्रारीवरुन केलेल्या चौकशी अहवालानुसार मुरकुटडोह येथील रेशन दुकान जिल्हा परवठा अधिकाऱ्याने रद्द करण्याचे आदेश दिले असून सदर रेशन दुकान दंडारी येथील बचत गटाला जोडण्यात आले आहे.

सदर स्वस्त धान्य दुकानदार दर महिन्याला नियमित रेशन वाटप करीत नसून कार्डधारकाकडून अवैध वसुली करीत असल्याची तक्रार गावकऱ्यांनी आणि सरपंचानी तहसील कार्यालय सालेकसा येथे केली. तहसीलदार नरसय्या कोंडागुर्ले यांनी या स्वस्त धान्य दुकानाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्या आदेशानुसार पुरवठा अधिकारी यांनी या गावाला भेट दिली असता गावकऱ्यांची तक्रार ऐकून घेतली. त्यांच्या तक्रारीच्या आधारावर तसा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडे पाठविला. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी प्रकरणाचा तपास करुन २७ मार्चला रेशन दुकान रद्द करण्याचे आदेश काढले.

### खोट्या तक्रारीवर कारवाई




**या प्रकरणात संबंधित दुकानदाराशी संपर्क केला असता त्यांनी प्रत्येक रेशनकार्डधारकाला दर महिन्याला नियमित अन्नधान्य वाटप केले. त्याचे छायाचित्रसुद्धा काढले असून याचे आपल्याकडे पुरावे आहेत. रेशनकार्डधारकाचे धान्य बाकी असल्यास ते आपण वाटप नियमित करुन केव्हाही आल्यास देत असतो. निवडणूक काळात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी खरेदी तक्रार केली आहे. जर तक्रार होती तर रेशन दुकानाला सील लावायला पाहिजे होते. परंतु तसे न करता आपल्या गैरहजेरीत रेशन काढून घेतले. एवढेच नव्हे तर पुरवठा अधिकाऱ्याने आपल्याला जातिवाचक शिवीगाळ केली.**

**नंदकिशोर साखरे, स्वस्त धान्य दुकानदार**

### नियमानुसार केली कारवाई

**१८ मार्च २०२४ रोजी मुरकुटडोह येथील गावकरी आणि ग्रामपंचायत कार्यालय दरेकसा येथून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार यांच्या आदेशान्वये १९ मार्च रोजी मुरकुटडोह येथे रेशनकार्डधारक, सरपंच, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य यांचे बयान घेण्यात आले. दुकान बंद असल्यामुळे दुकान बंद असल्याबाबत मौका पंचनामा सरपंच पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य आणि रेशनकार्डधारक यांच्या समक्ष करण्यात आला. २० मार्चला तहसीलदार यांनी अनियमिततेचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी यांना पाठविला. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी २६ मार्च रोजी रास्त भाव दुकानदाची सुनावणी घेऊन २७ मार्च रोजी सदर दुकान रद्दचा आदेश पारित केला.**

**संदेश हलमारे, पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, सालेकसा**

# नगर परिषदेचे जीर्ण छत कोसळले

**गोंदिया :** येथील नगर परिषदेच्या वरच्या माळ्यावरील कर विभागाचे जीर्ण छत कोसळले. ही घटना गुरुवारी (ता. ४) दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे कर्तव्यावर असलेल्या कमचाऱ्यांनी समयसूचकता दाखविल्याने मोठा अनर्थ टळला.



नगर परिषदेची संपूर्ण इमारत जीर्ण झाली आहे. दरवर्षी पावसाळ्यात छत गळत असते. त्यामुळे जीव मूठीत घेऊन कर्मचाऱ्यांना कर्तव्य पार पाडावे लागतात. आचारसंहिता संपल्यानंतर या जीर्ण इमारतीला पाडून नवीन इमारतीचे बांधकाम केले जाणार आहे. याकरिता ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हे खरे असले तरी अजूनही कर्मचारी जीव धोक्यात घालून नगर परिषदेच्या जीर्ण इमारतीत कामे करीत आहेत. गुरुवारी कर विभागात १० ते १५ कमचारी कर्तव्यावर असताना दुपारी साडेतीनच्या सुमारास अचानक छताचे प्लास्टर कोसळले. टेबलांवर प्लास्टर कोसळल्याने आणि आवाज आल्याने सर्व कर्मचारी समयसूचकता दाखवून बाहेर पडले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

# लाखो रुपयांचे दुकान गाळे पडले धूळखात



**गोंदिया:** नगरपलिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी, यासाठी शहरातील कचरा मोहल्ल्यात काही वर्षापुर्वी लाखो रुपये खर्चून दुकान गाळे बांधण्यात आले. परंतु अजूनही हे दुकान गाळे कुणालाही रोजगार उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. कुलूपबंद असलेले हे गाळे सध्या धूळखात पडले आहेत. ऑनलाईन निविदा मागवूनही लिलावासाठी कुणीच पुढे आले नसल्याचे नगरपालिका सांगत आहे. त्यामुळे नगरपालिकेचा गाळ्यांवधील लाखो रुपयांचा खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे.

नगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी, इतकेच नव्हे तर गरजूंना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी नगरपालिकेने कचरा मोहल्ल्यात दक्षिण व पश्चिमेला काही वर्षापुर्वी १७ दुकान गाळ्याचे बांधकाम केले. नगरपालिकेचा उद्देश चांगला असला तरी हे गाळे आजघडीला शोभेची वस्तू बनून उभे आहेत. हे गाळे ना कुणाला रोजगार देऊ शकले, ना पालिकेला आर्थिक उत्पन्न देऊ शकले. लाखो रुपयांचा खर्च मात्र, नगरपालिकेला बांधकामावर करावा लागला. दुकान गाळे लिलावासाठी सहा महिन्यांपुर्वी चारवेळा ऑनलाईन निविना मागविल्याचे नगरपालिका सांगत आहे. परंतु अजूनपर्यंत कुणीही लिलावात सहभाग घेतला नाही.

या गाळ्यांभोवती आणि शटरजवळ कुणीही यावे, वास्तव्य करावे आणि निघून जावे, असा प्रकार सुरु आहे. असामाजिक तत्वांचाही वावरही वाढला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकही असुरक्षिततचे जीवन जगत आहेत. लिलाव प्रक्रिया का रखडली? याचे उत्तरही नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना सापडत नाही. तथापि लिलाव प्रक्रिया पुढेही रखडून राहिल्यास या गाळ्यांना उधळी लागण्याची प्रसंगी, साहित्यांची मोठी नासाडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढेच नव्हे, तर नगरपालिकेचे लाखो रुपये पाण्यात जायलाही वेळ लागणार नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांनी धुळखात असलेल्या गाळ्यांचा प्रश्न त्वरित निकाली काढावा, अशी मागणी होत आहे.

### निवडणूक निरिक्षक यांनी स्ट्रांग रूम व मतदान प्रशिक्षण केंद्राला भेट

**गोंदिया :** गडचिरोली – चिमुर ( अ ज ) लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरिक्षक (सामान्य) अमिनेश कुमार पाराशर यांनी आज ६६ – आमगांव–देवरी विधानसभा मतदार संघातील मतदान पथकाचे प्रशिक्षण स्थळ, पोस्टल मतपत्र केंद्र, स्टाँग रुम, कमिशनिंग प्लॅन, तैनाती योजना इ. ठिकाणी भेट देवुन कामाची पहाणी करुन उपस्थित अधिका–यांना महत्वाच्या सुचना दिल्या.

सहा. निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता गायकवाड, तहसिलदार डॉ. रविंद्र होळी आमगांव तहसिलदार संतोष महाल्ले देवरी तहसिलदार नरसय्या कोंडागुर्ले तहसिलदार सालेकसा व इतर अधिकारी उपस्थित होते

# निवडणूक खर्चाची माहिती वेळेत सादर करा-जिल्हाधिकारी प्रजित नायर

**गोंदिया :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ मध्ये निवडणूक लढणारे उमेदवार व राजकीय पक्षांनी वेळोवेळी केलेल्या निवडणूक खर्चाची माहिती निवडणूक खर्च शाखेला वेळेत सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज सर्व नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. उपजिल्हाधिकारी निवडणूक किरण अंबेकर, नोडल अधिकारी खर्च जनार्धन खोटरे व सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवार व राजकीय पक्ष यांच्याकडून होणाऱ्या खर्चाचा हिशोब नोडल अधिकारी खर्च यांच्या चमू मार्फत नोंदविला जातो. जिल्हाधिकारी यांनी आज या संबंधीचा आढावा घेतला. निरिक्षक निवडणूक खर्च यांना प्रत्येक खर्च वेळेत सादर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मतदानाची तारीख जसजशी जवळ येईल तसतशी प्रचाराची गती वाढणार आहे. ही बाब लक्षात घेता खर्च नोंदविणाऱ्या विविध चमूनी सक्रिय होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सभा उशिरा असल्यास त्याचा खर्च दुसऱ्या दिवशी नोंदविणे आवश्यक आहे. मात्र त्याला फार विलंब होता कामा नये अशा सूचनाही त्यांनी केल्या.

राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या खर्चाच्या बाबतीत काटेकोरपणे नोंदी घेणे गरजेचे असल्याचे सांगून जिल्हाधिकारी म्हणाले की, प्रत्येक सभेचे व्हिडीओ चित्रीकरण केले गेले पाहिजे. याबाबतीत हयगय होता कामा नये. उमेदवाराने राजकीय सभेचा सादर केलेला खर्च व व्हिडीओ चित्रीकरण याचा ताळमेळ करून घ्यावा असेही त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे उमेदवाराने प्रचारासाठी छापलेले पॉम्प्लेट व वर्तमानपत्रात प्रसारित केलेल्या जाहिराती याचाही खर्च वेळच्यावेळी नोंदविण्यात यावा. निवडणूक खर्च निरिक्षक या बाबींचा नियमित आढावा घेत असून त्यांच्याकडे सर्व बाबी अचूकपणे जातील याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सांगितले.

सर्व संबंधीत नोडल अधिकारी यांनी निवडणूक खर्चाबाबतचे तपशील काळजीपूर्वक तपासूनच निवडणूक खर्च नोडल अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. राजकीय पक्ष व उमेदवार यांनी सुद्धा आपला निवडणूक खर्च वेळेत सादर करावा असे आवाहन त्यांनी केले. याबाबतीत निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. या बैठकीत अन्य विषयांवरही चर्चा करण्यात आली.

# उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांनी स्वत:चा बचाव करावा-जिल्हाधिकारी

## उष्णतेच्या लाटेसंदर्भात जिल्हा प्रशासनाकडून मार्गदर्शक सूचना

**गोंदिया :** संभाव्य उष्णतेच्या लाटेसंदर्भात गोंदिया जिल्हा प्रशासनाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आल्या. उष्णतेच्या लाटेमुळे शारिरीक ताण पडून मृत्यू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी खालील उपाययोजना कराव्यात, असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन कक्षातर्फे करण्यात आल्या आहेत. वातावरणीय बदल व तापमानात झालेली वाढ लक्षात घेता, पुढील दोन ते तीन महिने उष्णतेची लाट राहणार असा अंदाज आहे. उष्णतेच्या लाटेमुळे शारिरीक ताण पडून मृत्यू होण्याची शक्यता असते. उष्णतेच्या लाटेमुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.



याविषयी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी बैठक घेऊन, काय करावे : तहान लागली नसली तरी सुद्धा जास्तीत जास्त पाणी प्यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावे. बाहेर जाताना गॉगल, छत्री, टोपी, बूट व चप्पलचा वापर करावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत न्यावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस., घरी बनवलेली लस्सी, तोरणी, लिंबू पाणी, ताक इत्यादीचा वापर करावा. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा चटका बसण्याची चिन्हे ओळखावी व चक्कर येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे, तसेच त्यांना पुरेसे पाणी द्यावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा, तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे याचा वापर करण्यात यावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करावे. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असताना मध्ये मध्ये ब्रेक घेऊन नियमीत आराम करावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी. रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावे. जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी.

काय करू नये : लहान मुले व पाळीव प्राण्यांना बंद असलेले व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालू नये. बाहेरील तापमान अधिक असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावी व उन्हात अतिकष्टाची कामे करू नये. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी. दारू, चहा, कॉफी आणि काबोर्नेट थंड पेय घेऊ नये.

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रावर मिळणार आवश्यक सुविधा

## जिल्हाधिकारी प्रजित नायर, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रम

**गोंदिया :–** भंडारा–गोंदिया लोकसभा मतदार संघासाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार असून ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा मतदान केंद्रावर उपलब्ध असणार आहेत. व्हील चेअर, रॅम्प, बसण्याची सुविधा, मानक चिन्हे, साईन बोर्ड, मदतीला स्वयंसेवक, वैद्यकीय सेवा, ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी आदी सुविधांचा यात समावेश असणार आहे. सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा जिल्हा प्रशासनाने पुरेपूर प्रयत्न केला असून ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी शंभर टक्के मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रमअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील ६३–अर्जुनी मोरगाव, ६४–तिरोडा, ६५–गोंदिया व ६६–आमगाव विधानसभा मतदार संघाअंतर्गत एकूण ७४४१ दिव्यांग मतदार व ९५९४ ज्येष्ठ नागरिक मतदारांचा समावेश आहे. एकूण ७४४१ दिव्यांग मतदारांपैकी १११५ अंध, ३९६३ अस्थिव्यंग, ६४२ कर्णबधीर व १८०७ इतर दिव्यांग मतदार आहेत.

भारत निवडणूक आयोगाने सर्व पात्र दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांचा निवडणूक प्रक्रियेत समावेश करण्यासाठी, मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि त्यांची सोय करण्यासाठी, दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर त्यांची नोंदणी आणि मतदान सुलभतेसाठी पुरविल्या जाणाऱ्या सुविधांच्या संदर्भात वेळोवेळी विविध सूचना जारी केल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदान करणे सुकर व सोईचे व्हावे म्हणून जिल्हा प्रशासनाद्वारे सर्व उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

सर्व दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना थेट मतदान केंद्रांच्या दारापर्यंत पोहोचता येईल, याकरीता सर्व मतदान केंद्रांवर रॅम्पची व्यवस्था करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील एकूण १२८८ मतदान केंद्रांपैकी ७२३ मतदान केंद्रांवर ३९६३ अस्थिव्यंग दिव्यांग मतदारांकरीता ७२३ व्हील चेअरची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अंध १११५ मतदारांकरीता ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी उपलब्ध करुन देण्यात येणार असून सर्व अंध मतदारांकरीता मतदान केंद्रांवर भिंग (मॅग्निफायिंग ग्लास) उपलब्ध करण्यात आले आहेत.

प्रत्येक मतदान केंद्रांवर दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांना बसण्याकरीता बेंचेसची व्यवस्था करण्यात आलेली असून दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांना मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारापर्यंत घेऊन जाण्याकरीता प्रत्येक मतदान केंद्रांवर एनसीसी, एनएसएस स्काऊट आणि मार्गदर्शन इत्यादींच्या १८ वर्षाखालील २ ते ३ स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली आहे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना रांगेत थांबावे लागणार नाही यासाठी स्वतंत्र प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. मतदान कक्षाच्या मार्गावर मानक चिन्हे आणि साईन बोर्ड असलेले संकेतांक लावण्यात येणार आहेत.



जिल्ह्यात दिव्यांग व ८० वर्षावरील ज्येष्ठ नागरिक एकूण ४२० मतदारांनी पोस्टल मतपत्रिकेद्वारे मतदानाकरीता अर्ज सादर केले होते, अशा मतदारांचे घरी मतदान अधिकाऱ्यांचे पथक दिनांक ८ ते १० एप्रिल २०२४ या कालावधीत प्रत्यक्षात जाऊन पोस्टल बॅलेटद्वारे मतदान प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर योग्य पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर ज्येष्ठ नागरिक, दृश्य आणि लोकोमोटिव्ह दिव्यांग व्यक्ती आणि अशक्त हालचाली असलेल्या अशक्त मतदारांना मतदानाच्या दिवशी त्यांच्या निवासस्थानापासून ते मतदान केंद्रापर्यंत मोफत पिकअप आणि ड्रॉप सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

मतदानाच्या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर शुद्ध पिण्याचे पाणी, वेटिंग रोड, वैद्यकीय किट आणि सुलभ शौचालय व्यवस्था उपलब्ध करण्यात येणार आहे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांच्या सर्व तक्रारी आणि प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी १९५० ही टोल फ्री हेल्पलाईन सेवा सुरू करण्यात आलेली आहे. गोंदिया जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी सदर निवडणूकीत १०० टक्के मतदान करावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# ७ वर्षांपासून वाचनालय कुलूपबंद



**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएससी या स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी अभ्यासाची सवय लागावी तसेच त्यांना प्रशस्त व सुविधायुक्त इमारत मिळावी म्हणून सामाजिक न्याय विभागाच्या नाविण्यपूर्ण योजनेतून विशेष बाब म्हणून २०२१८–१९ मध्ये १५ लाख निधी देण्यात आला. त्या माध्यमातून सुसज्ञ अशी इमारत तयार झाली. मात्र गेल्या सहा वर्षांपासून ही इमारत कुलूपबंद असून सभोवताल धुळीचे साम्राज्य पसरले आहे. मात्र अद्यापही वाचनालय सुरु झाले नाही.

अर्जुनी मोरगाव पंचायत समितीच्या प्रशस्त आवारात सभापती निवासामागे ही वाचनालयाची इमारत सहा वर्षांपासून तयार आहे. ही माहिती तालुक्यातील जनतेला व विद्यार्थ्यांनाही नाही. प्रशस्त इमारत शौचालय, बाथरूमसह सज्ज आहे. या इमारतीत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी टेबल, खुर्च्या येऊन तयार आहेत. इलेक्ट्रीक फिटिंगही झाली, मात्र गेल्या सहा वर्षांपासून येथे वीज मीटरच लावण्यात आले नाही. या वाचनालयाच्या इमारतीत दोन कपाट असून दोन्ही कपाटामध्ये पुस्तकांचा साठा उपलब्ध आहे. या इमारतीचे काम सांभाळण्यासाठी समाजकल्याण विभागातील एक कंत्राटी समन्वयक व एक समतादूत आहे.

मात्र गेल्या सहा वर्षांपासून ही इमारत धुळखात पडली असल्याने तालुक्यातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होईल का? असा प्रश्न यानिमित्त विचारला जात आहे. वाचनालय सुरुच करायचे नव्हते तर १५ लाखांची सुसज्ञ इमारत बांधलीच कशाला? असा सवालही उपस्थित होत आहे. सध्या पोलीस ठाण्यात वाचनालयाची व्यवस्था आहे. या ठिकाणी तालुक्यातील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी येतात. मात्र तिथे जागा कमी पडत असल्याने अनेक विद्यार्थ्यांचा हिरमोड होतो. पोलीस ठाण्यातील वाचनालयात सतत अभ्यास करुन गतवर्षी बरैय्या नावाची मुलगी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षक बनली हे येथे उल्लेखनीय. ही कैफियत पंचायत समिती सदस्य संदीप कापगते यांनी मासिक बैठकीत मांडली. परंतु अद्यापही त्यावर कारवाई झाली नाही.

### जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे

तालुक्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवू शकरणाऱ्या व स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे वाचनालय सुरु झले तर त्यांना सोयीचे होऊ शकते. तसेच तालुक्यातील विद्यार्थ्यांचे अधिकारी बनण्याचे स्वप्नही साकार होऊ शकते. जिल्हास्तरावरील समाजकल्याण विभागाचे अधिकारी लक्ष देत नसल्याने विद्यार्थ्यांचा सामाजिक विकासच खुंटला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन हे वाचनालय सुरु करण्यासाठी संबंधितांना सुचित करावे, अशी विनंती तालुक्यातील विद्यार्थ्यांनी केली आहे.

# नानांचा फाजील "आत्म"विश्वास कार्यशून्य खा.मेंढेंच्या पथ्यावर?

## इतरांशी जुळवून घेण्याची शैलीच्या आड येतोय अहंकार, मतदारांमध्ये वाढताहेत शंका-कुशंका

**गोंदिया:-** संपूर्ण देशभरात सार्वजनिक निवडणुकांचे वारे जोरात वाहत आहेत. यातही भंडारा-गोंदिया मतदार संघात तब्बल २० वर्षानंतर भाजप विरुद्ध काँग्रेस असा थेट सामना रंगणार आहे. या निवडणुकीमध्ये काँग्रेस एक एक जागेसाठी झुंजत असताना खुद्द राज्याचे प्रदेशाध्यक्ष असलेल्या नाना पटोलेंच्या गृहजिल्ह्यातच मतदारांमध्ये संभ्रमावस्था आहे. नानांचा स्वभाव आणि जिल्ह्यात प्रचाराची कार्यपद्धती यावरून नानांचा "आत्म'विश्वास हा मतद-ारांमध्ये उदासिनताप्राप्त विद्यमान खासदार आणि भाजपचे उमेदवार यांच्या पथ्यावर तर पडणार नाही ना? अशी शंका सर्वत्र व्यक्त केली जात आहे. काँग्रेसला विद्यमान खासदाराविरुद्ध मतदारांमध्ये असलेली नाराजी कॅश करून घेण्यासाठी इतरांशी जुळवून घेत आपल्या उमेदवारासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. अन्यथा खुद्द प्रदेशाध्यक्ष यांच्याच मतदार संघात काँग्रेसला तोंडघशी पडावे लागले, तर नवल नको.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाच्या इतिहासात डोकावून पाहिल्यास हा मतदार संघ तसा काँग्रेसचा मजबूत बालेकिल्लाच म्हणावा लागेल. या मतदार संघात बहुतांश वेळा प्रचंड मताधिक्य घेत काँग्रेसचे खासदार लोकसभेवर निवडून गेल्याचे दिसते. काँग्रेसमधून फुटून राष्ट्रवादी काँग्रेसची निमिर्ती झाल्यावर याक्षेत्राचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेले. असे असले तरी मतदारांचा कॉंग्रेसप्रती असलेल्या विश्वास मात्र काही केल्या कमी झाला नाही. याचा फायदा काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीमुळे आजच्या राष्ट्रवादी (अजित पवार गटाचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी कायम घेतला.

काँग्रेस-राष्ट्रवादीमधील अंतर्गत कुरघोडीच्या राजकारणामुळे मध्यंतरी भाजपला याचा फायदा झाला. कॉंग्रेसच्या मतविभाजनामुळे विरोधकांना फायदा झाला असला तरी प्रत्यक्षात या मतदार संघात काँग्रेसचे मताधिक्य अधिक आहे. दरम्यान, काँग्रेसचे नानाभाऊ आणि राष्ट्रवादीचे प्रफुलभाई पटेल यांच्या



अवतीभवतीच या जिल्ह्यातील राजकारण सतत फिरत आले आहे. या दोन्ही नेत्यांमधील संघर्ष जिल्यातील मतदारांसाठी काही नवीन नाही.

आता २० वर्षानंतर मतपत्रिकेवर पुन्हा एकदा काँग्रेसचा "पंजा' दिसणार असल्यामुळे मतदारांत कमालीची उत्सुकता सुद्धा बघावयास मिळत आहे. नानाभाऊंसाठी ही निवडणुक प्रतिष्ठेची आहे. त्यामुळे त्यांनी प्रचाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे. याउलट महायुतीच्या दबावामुळे प्रफुल पटेल यांनी सुद्धा ही निवडणुक प्रतिष्ठेची केली आहे. असे असले तरी काँग्रेससाठी स्थिती अनुकूल आहे म्हटल्यास वावगे होणार नाही.

या मतदार संघातील लढत ही थेट नानाभाऊ आणि प्रफुल्ल पटेल यांच्यात होणार असा कयास लावला जात होता. एकीकडे काँग्रेससाठी एक एक जागा महत्वाची असल्याने नानाभाऊ स्वतः रिंगणात उतरतील अशी आशा होती. दुसरीकडे मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ही भाजप, शिवसेना (शिंदे) तसेच इतर घटक पक्षा सोबत गेल्याने महायुतीत ही जागा भाजपकडे गेली. त्यामुळे या ठिकाणी भाजपने आपला उमेदवार दिला.

काँग्रेसने नाना पटोले यांनी ठरविलेल्या डॉ. प्रशांत पडोळे सारख्या नवख्या उमेदवाराला उमेदवारी देत सर्वानाच धक्का दिला. विशेष म्हणजे प्रचाराची धुरा जरी नाना पटोले यांनी आपल्या खांद्यावर घेतली असली तरी मतदार संघातील अनेकांना आपल्याशी जुळवून घेण्यात ते अपयशी ठरत आहेत. काँग्रेसच्या प्रचारावरून सध्यातरी आ-पला उमेदवार निवडून आणण्यापेक्षा विरोधकांना ही निवडणुक सोपी करण्यावर काँग्रेस नेतृत्वाचा भर अधिक दिसत आहे. यात नाना पटोले यांचा अति आत्मविश्वास की अन्य काही हे मात्र कळायला मार्ग नाही.

भाजप उमेदवार सुनील मेंढे यांच्याप्रती असलेली नाराजीचा फ ायदा काँग्रेस ला घेता आला असता. मात्र अजूनतरी त्यात नाना पटोले व काँग्रेस यशस्वी ठरलेली दिसत नाही. काँग्रेसच्या प्रचाराची धुरा खुद्द त्यांनी आपल्या अंगावर घेतल्याचे बोलले जात असले तरी खरच त्यांना काँग्रेस चा उमेदवार निवडायचा की अजून काही तरी करायचे हे मात्र त्यांनाच ठाऊक.

एकंदरीत १९ ला होऊ घातलेल्या निवडणुकीला अजून-तरी वेळ आहे. तोपर्यंत नाना पटोले यांचा अति आत्मविर्श्वास कमी झाला तर ठीक नाहीतर खुद्द प्रदेशाध्यक्षांच्याच बालेकिल्ल्यात काँग्रेसच्या पतनास कोणीही थांबवु शकणार नाही, एवढे मात्र निश्चित.

# जिल्ह्यातील ४२० मतदार करणार गृह मतदान

## मतदानाची गोपनीयता पाळली जाणार,८ ते १० एप्रिल दरम्यान मतदान

**गोंदिया :-** भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये पहिल्यांदाच ८५ वर्षांवरील नागरिक तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या नागरिकांना गृह म तदानाची पर्यायी सोय उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार ११-भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघातील गोंदिया जिल्ह्यात एकूण ४२० नागरिकांनी गृहमतदानाची इच्छा दर्शविली आहे. यातील १७१ मतदार हे आमगाव विधानसभा मतदार संघातील असल्यामुळे ते गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात मतदान करतील. विशेष म्हणजे १०० अधिक वय असलेले जिल्ह्यात १७५ मतदार आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, पात्र असलेला एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा प्रशासन विविध उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करीत आहे. भारत निवडणूक आयोगाने सुद्धा पहिल्यांदाच ८५ वर्षांवरील ना-गरीक आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या दिव्यांग बांधवांना गृह



मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे इच्छुक मतदारांना नमुना १२-डी देण्यात आला आहे.

**मतदानाची गोपनीयता पाळण्याच्या सूचना :** गृहमतद-ाना संदर्भात अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण नुकतेच घेण्यात आले. यात फ्रॉर्म १३ - ए (डिक्लरेशन), फ्रॉर्म १३ - बी (कव्हर ए लिफाफा), फॉर्म १३ - सी (कव्हर बी लिफाफा) आणि फॉर्म १३ - डी (मतदान कसे करायचे याबाबत सूचना) आदी प्रक्रियेबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली. अतिशय अचूक पध्द-तीने गृह मतदानाची प्रक्रिया पार पाडायची असून त्याची गोपनीयता सुद्धा पाळणे आवश्यक असल्याचे प्रशिक्षणामध्ये सांगण्यात आले.

**अशी राहील प्रक्रिया :** गृहमतदानासाठी घरी जाणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डिक्लेरेशन म्हणजे फॉर्म १३-ए अचूक भरून घ्यावयाचे आहे. मतदान केलेल्या पत्रिकेची उभी घडी करून सदर पत्रिका छोटा लिफाफा म्हणजे फॉर्म १३-बी मध्ये टाकावा. डिक्लरेशन आणि छोटा लिफाफा दोन्ही कव्हर बी लिफाफ ा म्हणजेच फॉर्म १३-सी मध्ये टाकावा. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान गृह मतदानाची व्हिडीयोग्राफी करण्यात येणार असून दोन अधिकारी/ कर्मचारी, मायक्रो निरीक्षक आणि व्हिडीओग्राफर व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सुद्धा सोबत राहणार आहेत. घरी येणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे व मतदान प्रकियेची ज्येष्ठ मतदारांनी सुद्धा गोपनीयता पाळावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# परंपरागत विरोधक एकत्र, तरीही मताधिक्य कायम ठेवण्याचे आव्हान

## आजी-माजी आमदरांची प्रतिष्ठा पणाला, निवडणुकीकडे लक्ष



### स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अशी आहे स्थिती

**अर्जुनी मोरगाव नगरपंचायत, कृषी उत्पन्न बाजार समितीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) वर्चस्व आहे. तर सडक अर्जुनी नगरपंचायतवर राष्ट्रवादी काँग्रेस, पंचायत समितीत भाजपची सत्ता आहे. सर्वाधिक जि.प.सदस्य भाजपचे आहेत. एकंदरीत या मतदारसंघात महायुतीतील घटक पक्षांची पकड चांगली आहे.**

### निवडणूक लोकसभेची, पण चर्चा विधानसभेची

**अर्जुनी मोरगाव मतदारसंघावर सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे वर्चस्व असून, आ.मनोहर चंद्रीकापुरे हे प्रतिनिधीत्व करीत आहेत. पण महायुतीच्या पुर्वीपासून हा मतदारसंघ भाजपकडे होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत उमेदवारीचे काय चित्र असेल, याची चर्चा आतापासूनच होऊ लागली आहे.**

### हे आहेत प्रमुख प्रश्न

- **२८ वर्षांपासून रखडलेला झाशीनगर उपसा सिंचन प्रकल्प**
- **मोठे सिंचन प्रकल्प असून त्यांचा सिंचनासाठी पूर्ण क्षमतेने उपयोग नाही.**
- **मोठे उद्योग व प्रक्रिया उद्योगांचा अभाव, बेरोजगारी, उच्च शिक्षणासाठी पायपीट कायम.**

**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव मतदारसंघ हा भाजपच गड म्हणून ओळखला जातो. सन २००९ आणि २०१४ या दोन निवडणुकांत भाजपचे उमेदवार राजकुमार बडोले हे निवडून आले होते, तर २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार मनोहर चंद्रीकापुरे यांनी भाजपचा हा गड भेदला होता; पण आता राज्यातील बदललेल्या समीकरणामुळे महायुतीत सहभागी हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत. मनोहर चंद्रीकापुरे व राजकुमार बडोले हे आजी-माजी आमदार एकाच बाजूला आ-हेत. तरीही त्यांच्यासमोर मताधिक्य कायम ठेवण्याचे आव्हान आहे.

अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी आणि गोरे-गाव तालुक्यातील काही भागांचा समावेश आहे. तिन्ही तालुक्यात भाजपला मानणारा बराच वर्ग होता. शिवाय सहकार नेते, संघ विचारसरणीच्या नेते, पदाधिकारी यामुळेच भाजपची या तिन्ही तालुक्यांवर चांगली पकड होती. त्यामुळेच मतदारसंघ अस्तित्वात आल्यानंतर सन २००९ च्या विधानसभ निवडणुकीत राजकुमार बडोले हे ६१,८५६ मते घेत विजयी झाले होते. त्यांनी काँग्रेसचे रामलाल राऊत यांचा १६ हजार मतांनी पराभव केला होता. राऊत यांना ५३,५४९ मते मिळाली होती. तर तिसऱ्या क्रमांकावर अपक्ष उमेदवार किरण कांबळे यांना १०,४२८ मते मिळाली.

सन २०१४ विधानसभा निवडणुकीत पुन्हा बडोले यांनी बाजी मारली. त्यांना ६४ हजार ४०१, तर काँग्रेसचे राजेश नंदागवळी यांना ३४,१०६, राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोहर चंद्रीकापुरे ३१,८९३ व शिवसेनेच्या किरण कांबळे यांना १५,३३६ मते मिळाली.

२०१९ च्या निवडणुकीत चुरशीच्या लढतीत राजकुमार बडोले यांचा पराभव झाल. मनोहर चंद्रीकापुरे यांनी ७२,४०० ते घेतली. तर राजकुमार बडोले यांना ७१,६८२ मते मिळाली होती. अवघ्या ८०० मतांनी चंद्रीकापुरे विजयी झाले. बडोले यांच्या विजयाची हॅट्ट्रिक रोखली गेली. आता बदललेल्या समीकरणात बडोले व चंद्रीकापुरे महायुतीच्या घटक पक्षात आहेत. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघातून भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रातून भाजप उमेदवार सुनील मेंढे यांना मताधिक्य मिळवून देण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. दुसरीकडे अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा गृहगड मानला जातो. त्यांना मानणारा बराच वर्ग या मतदारसंघात आहे. याचा काँग्रेस उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांना लाभ मिळू शकतो. त्यासाठीच पडोले यांनी या मतदारसंघावर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे.

# भाजपच्या गडातून किती मते मिळणार?

**गोंदिया:** तिरोडा, गोरेगाव आणि गोंदिया तालुक्याचा काही भाग मिळून तिरोडा विधानसभा मतदारसंघ तयार झाला आहे. मागील तीन निवडणुकांपासून या मतदारसंघावर भाजपचे वर्चस्व आहे. तर या मतदारसंघाचे विद्यमान आ. विजय रहांगडाले हे सलग दुसऱ्यांना निवडून आले आहेत. त्यामुळे लोकसभा



निवडणुकीत त्यांच्या मतदारसंघातून भाजपच्या उमेदवाराला लीड मिळवून देण्याचे आव्हान असणार आहे.लोकसभा निवडणुकीच्या विजयाच्या पावती विधानसभेच्या तिकिटाचे समीकरण बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांना हा गड भेदण्यासाठी रणनिती आखावी लागणार आहे.

तिरोडा विधानसभा मतदारसंघाने अनेकदा नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. तर मागील पंधरा वर्षाचा इतिहास पाहिल्यास सलग दुसऱ्यांदा निवडून येण्याचा बहुमान आ.विजय रहांगडाले यांना मिळाला आहे. आ. रहांगडाले यांनी मागील दहा वर्षात या मतदारसंघात केलेली कार्यकर्त्यांची बांधणी, नगर परिषद, नगर पंचायत आणि दोन पंचायत समित्यांवरील वर्चस्व, बाजार समितीत एकहाती सत्ता, या मतदारसंघातील ग्रामपंचायतीवर स्थापन केलेले वर्चस्व आणि विश्वासू पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची तयार केलेली फळी हे त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. त्यामुळेच त्यांना या मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा संधी मिळणार असल्याचे बोलल्या जाते.

आ.विजय रहांगडाले यांनी सन २०१४ च्या निवडणुकीत ५४१६० मते घेत, तर सन २०१९ मध्ये ७६ हजार ४८२ मते घेत विजय संपादन केला. सन २०१४ च्या निवडणुकीच्या तुलनेत त्यांच्या मतांच्या टक्केवारीत वाढ झाली होती. त्यामुळेच या विधानसभा मतदारसंघातून लोकसभा निवडणुकीत उमेदवाराला लीड मिळवून देण्याचे आव्हान आ.रहांगडाले यांच्यासमोर असणार आहे.

या मतदारसंघात माजी आ. खुशाल बोपचे, माजी आ.दिलीप बन्सोड यांना मानणारा बराच वर्ग आहे. आता हे दोघेही महाविकास आघाडीत आहेत. त्यामुळे या दोघांनी योग्य समन्वय साधल्यास येथून महाविकास आघाडीच्या उमेदवाराला लाभ होऊ शकतो.

### तिसऱ्या उमेदवाराची भूमिका राहिली मसत्वपूर्ण

**तिरोडा विधानसभा मतदारसंघातील मागील तीन निवडणुकांचा इतिहास पाहिल्यास या मतदारसंघात उमेदवाराच्या विजयात तिसऱ्या उमेदवाराची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. सन २००९ च्या निवडणुकीत भाजपचे खुशाल बोपचे यांनी विजय संपादन केला होता. यात दुसऱ्या क्रमांकावर सुशील रहांगडाले हे होते. त्यांना ५५८२७ मते मिळाली होती. तर तिसऱ्या क्रमांकावर दीपक हिरापुरे होते. त्यांना २५५२७ मते मिळाली होती. सन २०१४ च्या निवडणुकीत भाजपचे विजय रहांगडाले यांना ५४ हजार १६० मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार दिलीप बन्सो यांना ४१०६२ मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार राजलक्ष्मी तुरकर यांना ३११४७ मते मिळाली होती. २०१९ मध्ये भाजपचे विजय रहांगडाले यांना ७६ हजार ४८२ मते, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रविकांत बोपचे यांना ५० हजार ५१९ मते मिळाली होती. तर अपक्ष उमेदवार दिलीप बन्सोड यांना ३३ हजार १८३ मते मिळाली होती. त्यामुळे या तिन्ही निवडणुकांचे समीकरण पाहता, यात तिसऱ्या उमेदवाराने घेतलेली मते विजयाच्या समीकरणात महत्वपूर्ण ठरली आहेत.**

### बदललेल्या समीकरणाने बळ कुणाला?

**राज्यात आता महायुती आणि महाविकास आघाडीचे नवीन समीकरण तयार झाले आहे. हेच समीकरण विधानसभा निवडणुकीत कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे महायुतीत हा मतदारसंघ भाजपकडे, तर महाविकास आघाडीत काँग्रेसकडे राहण्याची शक्यता आहे. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) सोबतीने भाजप उमेदवाराची ताकद निश्चित वाढेल. तर महाविकस आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या स्थानिक नेत्यांनी योग्य समन्वय साधल्यास भाजपचा विजय रथ रोखण्यात त्यांची महत्वपूर्ण भूमिका राहू शकते.**

### उद्योग, रोजगार, सिंचनाचे प्रश्न कायम

**तिरोडा विधानसभा मतदारसंघात अदानी विद्युत प्रकल्प वगळता, एकही मोठा उद्योग नाही. या प्रकल्पात स्थानिकांना किती रोजगार मिळाला हा सुद्धा नेहमीच चर्चेचा मुद्दा राहिला आहे. धापेवाडा सिंचन प्रकल्प अद्यापही पूर्ण क्षमतेने सुरु झाला नाही. रोजगाराचा प्रश्न सुद्धा कायम आहे. त्यामुळे हे मुद्दे या निवडणुकीत कळीचे ठरु शकतात.**

# उड्डाणपुलाने वाढविली कोंडी, भूमिगतमार्गे जाणे होतेय भारी!

## दोन वर्षानंतरही पुलाचे काम संथ गतीने: श्रेयवादाच्या लढाईत मात्र सारेच पुढे



**गोंदिया:** शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील जुना उड्डाणपूल जीर्ण झाल्याने तो पाडण्यात आला. पण या पुलाचे बांधकाम सुरु झाले नव्हते. त्यानंतर शहरवासीयांची ओरड वाढल्याने पुलाचे बांधकाम सुरु करण्यात आले. यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी आपल्यामुळेच या पुलाचे बांधकाम कसे सुरु झाल्याचे दाखविण्यासाठी पत्रकबाजी केली. मात्र, यानंतरही या पुलाच्या बांधकामाला गती आलेली नाही. चार महिन्यांच्या कालावधीत या पुलाचा एक साथा पिल्लरसुद्धा उभा झाला नाही. पुलाचे काम कासव गतीने सुरु असल्याने शहरातील वाहतूक सध्या अंडरग्राऊंडमार्गे सुरु आहे, पण या मार्गावरुन जाताना नागरिकांना अडचणीचे जात आहे. त्यामुळे उड्डाणपुलाने वाढविली वाहतूक कोंडी अन् अंडरग्राऊंडमार्गे जाणे होतेय भारी, असेच चित्र आहे.

गोंदिया शहराचे एक आगळे वैशिष्टय आहे. शहरात कुठलेही विकासकाम मंजूर झाले, तर ते आपल्यामुळेच कसे मंजूर झाले हे सांगण्यासाठी नेतेमंडळी लगेच प्रसिद्धीपत्रक काढून त्याचे श्रेय घेण्याची संधी सोडत नाहीत.

### एकाच कंत्राटदाराकडे तीन कामे

**शहरातील उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने याच मार्गावरील अजून दोन पुलाचे कंत्राट घेतले असल्याची माहिती आहे. त्यामुळे कंत्राटदाराने गोदिया-बालाघाट मार्गावरील महत्वपूर्ण असलेल्या उड्डाणपुलाला प्राधान्य न देता इतर दोन पुलांकडे लक्ष केंदीत केले असल्याचे चित्र आहे.**

राजकारणात हे गैर नसेलही, तर मग जी कामे रखडली आहेत, ती मार्गी लावण्यासाठी अथवा ते का संथ गतीने सुरु आहे हे सांगण्यासाठी कुणी पुढे येत नाही. निवडणुकीतही हा विषय गाजला होता. गोंदिया शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील उड्डाणपूल जीर्ण झाल्याने तो वाहतुकीसाठी तीन वर्षापुर्वी बंद केला. यानंतर वर्षभरापुर्वी हा पूल पाडण्यात आला. त्यामुळे शहराच्या दोन भागांना जोडणाऱ्या या पुलाअभावी दोन्ही भागांचा संपर्क तुटला. रेलटोली, मरारटोली, रामनगर, कुडवा या परिसरातील नागरिकांना शहरात येण्यासाठी अंडरग्राऊंडशिवाय पर्याय उरला नाही. पण अंडरग्राऊंड पुलाखाली नेहमीच पाणी साचून असते. त्यामुळे या पुलाखालून येणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखेच झाले आहे.

तर नवीन उड्डाणपूलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने किमान दोन वर्षे तरी हा पूल तयार होण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे दोन वर्षे पुन्हा शहरवासीयांना हा त्रास सहन करावा लागणार आहे. या पुलाचे बांधकाम कासव गतीने सुरु असताना त्याला गती मिळावी म्हणून श्रेयवादाच्या लढाईत अग्रेसर असलेले नेतेसुद्धा गप्प असल्याचे चित्र आहे. तर आपल्याच वजनामुळे हा पुल मार्गी लागणारेसुद्धा यावरुन



### वाहतूक कोंडी कायम

**उड्डाणपूलाअभावी शहरातील अंडरग्राऊंडमार्गे वाहनांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे या मार्गावर सातत्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. शिवाय मार्गावरील अपघातांची संख्यासुद्धा वाढली आहे.**

### संथ गतीच्या कामाचे श्रेय कोण घेणार?

**शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील उड्डाणपूलाचे काम मागील चार महिन्यांपासून अत्यंत संथ गतीने सुरु आहे. त्यामुळे याचे श्रेय घेण्यासाठी मात्र कुणी पुढे येत नसल्याचे चित्र आहे.**

पाठपुरावा करताना दिसत नाहीत. त्यामुळे शहरवासीयांमध्ये रोष व्याप्त असून श्रेयवादाच्या लढाईत अग्रेसर असलेले नते आता गेले कुठे, असा सवाल शहरातील नागरिक करीत आहेत.

# देवेंद्र व परिणय सोडून गोंदिया भंडारा जिल्ह्यातील सर्व नेत्यांचा मीच रेफरी-प्रफुल पटेल

**गोंदिया:-** भंडारा-ोंदिया लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुती उमेदवाराच्या प्रच-ारार्थ आयोजित सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांनी नागपूर निवासी देवेंद्र व परिणय सोडले तर भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील सर्वच पक्षांच्या नेत्यांचा मी रेफरी असल्याचा उल्लेख केल्याने एकच खळबळ उडाली आहे. ते येथील ग्रँड सीता हॉटेलच्या हॉलमध्ये शहरातील भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना, चाबी संघटन व आर.पी.आय महायुतीचे पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्या बैठकीत आज शनिवारला बोलत होते.



यावेळी मंचावर भाजपचे विश्वास पाठक, आमदार विनोद अग्रवाल,माजी आमदार राजेंद्र जैन, परिणय फुके, गोपालदास अग्रवाल, रमेश कुथे, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहागंडाले, विनोद हरिणखेडे नेतराम कटरे, अशोक इंगळे, राजकुमार भेल-ावे, छोटूभाऊ पटले, श्री कशीश जायस्वाल, पूजाताई अखिलेश सेठ, नानु मुदलीयार, अमित झासह पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना खा.पटेल म्हणाले की, लोकसभेची निवडणुक ही देशाची निवडणुक आहे. सध्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे कार्य विकशिनशील देश म्हणुन प्रभावीत करणारे आहेत.आज भारताची ओळख जगात सर्वात शक्तिशाली व विकशिनशील देश म्हणुन ख्याती प्राप्त आहे.आणी हे केवळ नरेंद्र म ोदी मुळेच शक्य झाले आहे.त्यामुळे आपन प्रभावीत होवुन व भंडारा-गोंदिया जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आपन भाजपसोबत आहोत. त्यामुळे सशक्त भारतासाठी मोर्दीजींचे हात बळकट करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. ते करीत असतानाच माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्या खांद्याला खांदा लावून आम दार विनोद अग्रवालांना लोकसभा निवडणुकीत प्रचार करण्याचा सल्ला दिला.

तसेच या दोन्ही जिल्ह्या-तील कुठल्याही पक्षाचा नेता असो त्यांना खेळवण्याचे काम मीच करीत असतो होय की नाही रमेशभाऊ असे म्हणत मीच यांचा रेफरी आहे.फक्त नागपूरचे आमचे देवेंद्र व डॉ.परिणय यांचाच रेफरी नाही.परंतु परिणयचा सुध्दा मीच रेफरी होणार होय की नाही असे म्हणताच सभागृहात कार्यकर्त्याम ध्ये उत्साह दिसून आला.

# ८५ वर्षांवरील मतदारांनी केले गृहमतदान

## गुप्त मतदान पद्धतीने झाले मतदान, जिल्ह्यात ४२० मतदार

**गोंदिया:** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे वैशिष्टय म्हणजे घरुन मतदान हे आहे. भारत निवडणूक आयोगाने पहिल्यांदाच ८५ वर्षांवरील नागरिक आणि ४० टक्क्यापेक्षा जास्त असलेल्या दिव्यांग बांधवांना गृह मतदानाची सोय उपलब्ध करुन दिली आहे.

भंडारा गोंदिया लोकसभा निवडणुकीसाठी सोमवारी (दि.८) गृह मतदान घेण्यात आले. शहरा-तील शिवाजी वॉर्ड रेलटोली येथील ज्येष्ठ नागरिक कृष्ण कुमार जैन (वय ८९) यांच्या घरी सोमवारी मतदान अधिकारी व कर्मचारी जाऊन त्यांचे मतदान केले. हे मतदार सर्वस्वी गुप्त पद्धतीने करण्यात आले.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील गोंदिया जिल्ह्यात एकूण ४२० नागरिकांनी गृहमतदानाची इच्छा दर्शविली होती. यातील १७१ मतदार हे आमगाव विधानसभा मतदारसंघातील असल्यामुळे ते गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदारसंघात मतदान केले. सोमवारी जिल्ह्यातील ८५ वर्षावरील १०९ मतदारांनी मतद-ानाचा हक्क बजाविला.

**भंडारा जिल्ह्यात ५३६ मतदारांनी बजावला गृह मतदानाचा हक्क**

**भंडारा:** निवडणूक आयोगाने पहिल्यांदाच दिव्यांग मतदारांना आणि ८५ वर्षाहून अधिक मतदारांना गृह मतदानाचा हक्क उपलब्ध करून दिला. त्यानुसार भंडारा जिल्ह्यात ५३६ मतदारांनी काल गृह मतदान करत मतदानात हक्क बजावला. आयोगाच्या वतीने पहिल्यांदाच गृह मतदान हा उपक्रम घेण्यात आले त्यात भंडारा जिल्ह्यातील मतदारांनी सक्रिय सहभाग घेतला. जिल्ह्यात काल ७ एप्रिल २०२४ ला निवडणुकीचा भाग म्हणून गृह मतदानाच्या पहिल्या दिवशी भंडारा जिल्ह्यात ३३ पथकांनी गृह मतद-



ानाचे कार्य पार पाडले.

८५ वर्षाहून अधिक वयोगटातील ज्येष्ठ नागरिक आणि भंडारा येथील दिव्यांग मतदारांना घरपोच मतदानाची सुविधेचा लाभ घ्यायचा होता,अशी सुविधा प्रथमच भारतीय निवडणूक आयोगद्वारे करण्यात आली.

त्यामध्ये भंडारा विधानसभा क्षेत्रात ८ चमू तर साकोली मध्ये १३ चमू, तुमसर मध्ये १२ चमू अश्या एकूण ३३ चमुनी गृह मतदानाचे कार्य आयोगाच्या निर्देशानुसार पार पाडले. त्यामध्ये भंडारा तालुक्यातून १३९ साकोली तालुक्यातून १८९ तर तुमसर तालुक्यातील २०८ नागरिकांनी मतदानाचा हक्क बजाव-ला. विशेषता ८५ वर्षांवरील मतद-ारांमध्ये स्त्रियांची संख्या लक्षणीय होती. तसेच दिव्यांग बंधू भगिनींनी सुद्धा मतदानाचा हक्क नोंदवला .यावेळी गृह मतदान करताना आयोगाने दिलेले सूचनांचे पालन नियुक्त अधिकारी -कर्मचाऱ्यांनी केले तसेच गोपनीयतेने गृह मतदान करण्यात आले.